The Department of Public Instruction, Bombay.

A RUDIMENTARY MARÁTHI GRAMMAR

BY

RÁO BAHÁDUR DÁDOBÁ PÁNDURANG,

AUTHOR OF A LARGE MARÁṬHÍ GRAMMAR, WITH A SUPPLEMENT &c. &c.

SIXTEENTH EDITION.—75,000 Copies.

Registered for Copyright under Government of India's Act XXV of 1867.

BOMBAY:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1890.

Price one Anna.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळांसाठें

मराठी लघु व्याकरण.

हें

रावबहादूर दादोबा पांडुरंग

मोठें व्याकरण व पूरणिका यांचे कर्ते

यांणीं केलें.

आवृत्ति सोळावी.—७५,००० प्रती.

मुंबई:

गव्हर्मेंट सेंट्रल बुक-डीपो.

इसवी सन १८९०.

किंमत एक आणा.

प्रस्तावना.

पहिल्या शिकणारास व लहान मुलांस माझ्या मोठ्या व्याकरणाची समजूत पाडण्यास शिक्षकास फार कठीण पडतें, ह्मणोन पुष्कळ दिवसांपासून बोभाट चालत होता. या करतां त्याच व्याकरणाचा संक्षेप केला असतां तो बोभाट राहणार नाहीं, असा विचार करून विद्याखात्यातील अधिकाऱ्यानीं मलाच तें काम करायास सांगितलें; त्यावरून संतोषानें हें पुढील संक्षिप्त व्याकरण म्या रचिलें आहे आणि त्याचें नांव लघु व्याकरण असें ठेविलें आहे. मोठ्या व्याकरणांत जो सर्व प्रकरणांवर विस्तार केला आहे तो मात्र यांत काढून टाकिला आहे, परंतु बहुतकरून तीं सारीं प्रकरणें संक्षिप्त रूपानें यांत आणिलीं आहेत; आणि त्यांच्या मूळ पीठिकाचें ज्ञान लहान विद्यार्थ्यांस थोड्या आयासानें व्हावें अशा सोप्या रीतीनें तीं सारीं प्रकरणें सांगितलीं आहेत. पुष्कळ वर्षांपासून मोठ्या व्याकरणाची पद्धति बहुधा सर्वत्र चालत आली आहे, ह्मणोन संतोषानें तिचेंच एथें म्या अनुसरण केलें आहे.

मु० मुंबई, ता० २१ वी नवेंबर, सन १८६५. दा० पां०.

अकरावी आवृत्ति.

या पुस्तकाची दहावी आवृत्ति माझ्या परोक्ष कोणीं तपासली ती नकळे. तींत पुष्कळ अशुद्धें व मजकुराची असंगतिही आढळली. तीं सर्व म्यां ईंत नीट करून ही आवृत्ति तपासली आहे.

ता० २५ वी सप्तेंबर, सन १८७९. दा० पां०.

बारावी आवृत्ति.

सदर प्रमाणें.

मु० मुंबई, १२ जून, सन१८८२. दा० पां०.

मराठी लघु व्याकरण.

१. शुद्ध कसें बोलावें, आणि शुद्ध कसें लिहावें; तसेंच, हें शुद्ध कां, आणि हें अशुद्ध कां, हें व्याकरण शिकल्यानें समजतें.

२. व्याकरणाचे मुख्य भाग तीन आहेत; ते हे-**वर्णविचार, शब्दविचार**, आणि **वाक्यरचना.**

१. वर्णविचार.

३. वर्णविचारांत **अक्षरांचा** आणि त्यांच्या **अवयवांचा** विचार सांगितला असतो.

४. वर्ण ह्मणजे अ पासून ज्ञ पर्यंत जीं मूळ अक्षरें त्यांतून प्रत्येक.

५. वर्णांमध्यें दोन भेद आहेत—**स्वर** आणि **व्यंजनें.**

६. ज्यांच्या साहाय्यानें अक्षर सिद्ध होतें ते **स्वर.**

७. स्वरावांचून ज्यांचा पूर्ण उच्चार होत नाहीं तीं **व्यंजनें.**

८. स्वर सोळा आहेत;-अ, आ, इ, ई, इ० अः पर्यंत.

९. यांत—अ, इ, उ, ऋ, ऌ, हे **ऱ्हस्व स्वर.**

१० आ, ई, ऊ, ॠ, ॡ, हे **दीर्घ स्वर.**

११ ए, ऐ, ओ, औ, हे **संयुक्त स्वर.**

१२ अं हा **अनुस्वार**, आणि अः हा **विसर्ग.** अनुस्वार आणि विसर्ग समजण्या करितां अ या अक्षरावर(ं) आणि अ च्या पुढें (:) अशा अनुक्रमें खुणा करून दाखवितात.

१३. यांत ऋ, ॠ, ऌ, ॡ, हे स्वर निवळ मराठी शब्दांत येत नाहींत.

१४. व्यंजनें चौतीस आहेत; क्, ख्, ग्, घ्, ङ्, इ० पासून ळ् पर्यंत†.

१५ व्यंजनांचा पूर्ण उच्चार होत नाहीं, ह्मणोन तीं क्, ख्, च्, त्, म्, अशीं लिहून दाखवितात.

१६. क् या व्यंजनास अ हा स्वर मिळविला ह्मणजे क असें पूर्ण उच्चाराचें अक्षर होतें; तसेंच त्यास आ मिळविला असतां का, इ मिळविली असतां कि, उ मिळविला असतां कु, इ० अशीं अक्षरें होतात.

सारे स्वर मिळवून एक बाराखडी लिहून दाखवितों.

क, का, कि, की, कु, कू, कृ, कॄ, क्ऌ, क्ॡ, के, कै, को, कौ, कं, कः.

यांत बहुधा ऋ, ॠ, ऌ, ॡ, हे स्वर व्यंजनाशीं मिळवून दाखविण्याची वहिवाट नाहीं, म्हणोन या पत्तीस बाराखडी असें नाव आहे.

१७. क्ष् आणि ज्ञ् हीं जोडाक्षरें आहेत. क् आणि ष् मिळून क्ष् होतो; ज् आणि ञ् मिळून ज्ञ् होतो.

१८. क पासून म पर्यंत जे वर्ण त्यांचे पांच वर्ग केले आहेत; ते असेः—क ख ग घ ङ;—च छ ज झ ञ;—ट ठ ड ढ ण;—त थ द ध न;—प फ ब भ म. यांस अनुक्रमें, कवर्ग, चवर्ग, टवर्ग, इ० ह्मणतात; आणि पुढें राहिले ते य, र, ल, व, यांस एथें यवर्ग, आणि श, ष, स, ह, ळ, यांस शवर्ग*असें उगीच संज्ञा करितां ह्मटलें आहे.

---

† नियम १७ खालीं पहा. *माझ्या मोठ्या व्याकरणाच्या पूरणिकेंत यांच्या विस्तारानें शास्त्रसंज्ञा दाखविल्या आहेत.

जोडाक्षरें.

१९. दोन अथवा अधिक व्यंजनें जोडून जें एक अक्षर होतें त्यास जोडाक्षर ह्मणावें; जसें—क्क, द्य, स्य, भ्रा, श्री इ०.

२०. कित्येक जोडाक्षरांचा आकार मूळ अक्षरांच्या आकाराहून कांहींसा निराळा असतो, ह्मणोन तीं ओळखतां येत नाहीत; त्यांतून कित्येक एथें दाखवितों.

क्त, त्र, क्र, अ० क्ष, त्त, स्न, स्छ, द्य, ह्य, श्र, इ०.

२१. र् या व्यंजनास जें अक्षर जोडायाचें त्याच्या माथ्यावर ऽ अशी खूण करितात; ईस रेफ ह्मणतात. जसें—र्म, र्क, र्य, इ०.

स्थानविचार.

२२. मुखाच्या ज्या स्थानापासून जो वर्ण निघतो तें त्या वर्णाचें **स्थान** होय.

२३. हीं स्थानें आतां सांगतों.—

अ, आ, कवर्ग, ह, आणि अः यांचें **कंठस्थान.**

इ, ई, चवर्ग, आणि य, श, यांचें **तालुस्थान.**

उ, ऊ, पवर्ग, यांचें **ओष्ठस्थान.**

ऋ, ॠ, टवर्ग, आणि र, ष, ळ, यांचें **मूर्द्धास्थान.**

ऌ, ॡ, तवर्ग, आणि ल, स, यांचें **दंतस्थान.**

ए, ऐ, यांचें **कंठतालुस्थान.**

ओ, औ, यांचें **कंठौष्ठस्थान.**

व, याचें **दंतौष्ठस्थान.**

अं, यांचें **नासिकास्थान.**

२४. नाकांतून जो स्वराचा उच्चार निघतो त्यास अनु-

स्वार, आणि असा त्या वर्णांचा उच्चार असतो त्यास अनुनासिक वर्ण ह्मणतात; जसें–अँ, आँ, ईं, उँ, इ०.

याचा बारीक भेद मोठ्या व्याकरणावरून समजून घ्यावा.

२५. स्वर उच्चारतां जो मध्येंच त्यास घोंटाळा देतात त्यास **विसर्ग** ह्मणतात; जसें—अः, कः, भिः, उः, इ०. मराठींत विसर्ग नाहीं.

तथापि छिः, थुः, अंः, हे मराठी शब्द उच्चारावयास कधीं विसर्ग लागतो.

२६. व्यंजनांच्या वर्गांतले जे शेवटले वर्ण—ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांचीं त्या त्या वर्गांचीं स्थानें असून आणखी यांचें सर्वांचें नासिकास्थानहि आहे. हे **अनुनासिक** वर्ण होत.

अनुस्वाराचा उच्चार करितांना त्या अनुस्वारा पुढलें जें व्यंजन त्या व्यंजनाच्या वर्गांतील शेवटलें जें अनुनासिक त्याचें मध्यें उच्चारण करावें लागतें, जसें—संग यांत अनुस्वारा पुढला वर्ण जो ग, त्याच्या वर्गांतील अनुनासिक ङ् याचा मध्यें उच्चार होतो, ह्मणजे सङ्ग असा त्या अनुस्वाराचा उच्चार होतो, याचप्रमाणें—रंक, तंटा, पंडित, धंदा, कुंभार, इ० शब्दांत अनुस्वाराच्या पुढील वर्णांच्या धोरणा प्रमाणें निरनिराळा उच्चार जाणावा.

य, र, ल, व, श, ष, स, ह, हे वर्ण पुढ असतां मागील आनुस्वराच्या मूळच्या उच्चारांत कांहीं फेर होतो, जसें—**संयोग**, **संरक्षण**, **संलग्न**, **भंवरा**, **संसार**, **संहार**, इ०.

२७. मराठी शब्दांच्या शेवटीं अनुस्वार असतां त्यांचें अनुनासिक उच्चारण होतें; जसें–कां, तूं, तें, जों, तळ, इ०.

संधिविचार.

२८. दोन वर्ण जेथें सांधतात, ह्मणजे एकांत एक मिळून जातात, तेथें त्या वर्णांचा **संधि** ह्मणतात; जसें–व**स्त्राग्र**. या शब्दांतील **वस्त्र** शब्दाचा शेवटला **अ** वर्ण, आणि **अग्र** शब्दाचा पहिला **अ** वर्ण, हे दोन एकांत

एक मिळून आ होऊन घटाकाश असा शब्द झाला आहे; यांत आ हा त्यांचा संधि जाणावा.

याचप्रमाणें-राम + आश्रय= रामाश्रय.

गंगा + अर्पण = गंगार्पण.

राजा + आज्ञा = राजाज्ञा.

हरि + इच्छा = हरीच्छा

भानु + उदय = भानूदय.

२९. जेथें दोन स्वर सांधतात तेथें स्वरसंधि ह्मणतात.

३०. जेथें दोन व्यंजनें सांधतात तेथें व्यंजनसंधि ह्मणतात.

हे संधि संस्कृत शब्दांत होतात; मराठी शब्दांत होत नाहींत; तथापि मराठी भाषेंत संधि झालेले संस्कृत व इतर शब्द पुष्कळ येतात, ह्मणोन त्यां विषयीं थोडक्यांत मुख्य मुख्य नियम सांगतों.

३१. एका जातीचे स्वर मागें पुढें असले तर त्यांचा संधि त्यांच्याच दीर्घ स्वरांत होतो.

(याचीं उदाहरणें वर दिलीं आहेत.)

३२. एका जातीचे स्वर जर नसले तर त्यांचे संधि येणेंप्रमाणें होतातः—

स्वर.	संधि.	उदाहरणें.
अ, आ, + इ, ई,	= ए	मुखेंदु, सुरेश्वर, महेश्वर.
अ, आ, + उ, ऊ,	= ओ	शीतोष्ण, गंगोदक.
अ, आ, + ए, ऐ,	= ऐ	एकैक, मतैक्य.
अ, आ, + ओ, औ,	= औ	गंगौघ, भवौषध.

स्वरसंधीचे आगळी नियम, आणि व्यंजनसंधीचे सारे नियम जाणावयाचे असल्यास माझ्या मोठ्या व्याकरणांतलें संधिप्रकरण पहावें.

२. शब्दविचार.

३३. ज्या पासून कांहीं अर्थ उत्पन्न होतो तो **शब्द**. (मो० व्या० नि० ९१. पृ० २० पहा). शब्दांच्या योगानें भाषा होत्ये.

३४. शब्द दोन प्रकारचे असतात; **सिद्ध** आणि **साधित**.

३५. जे शब्द इतर शब्दांपासून निघाले नसतात ते **सिद्ध** शब्द; जसें—लांकूड, घोंडा, हात, पाय, तोंड, इ०.

३६. जे शब्द इतर शब्दां पासून साधतात, ते **साधित** शब्द होत; जसें—लांकडी, धोंडफोड्या, हातचें, तोंडचें, विद्वान, शास्त्री, इ०.

३७. या साधित शब्दांचा **सामासिक** ह्मणोन आणखी एक प्रकार आहे. दोन अथवा अधिक शब्दांचा समास होऊन ह्मणजे कांहीं अर्थ ठेवून ते मिळून जो एक शब्द होतो, तो **सामासिक** शब्द ह्मणावा; जसें—आईबाप, बहिणभाऊ, विटिदांडू, साखरभात, चक्रपाणि, इ०.

३८. आणखी शब्दांचे **सविभक्तिक** आणि **अविभक्तिक** (अथवा **अव्यय**) असे दोन भेद आहेत.

३९. ज्या शब्दांवरून विभक्तींचीं कार्यें होतात, ह्मणजे ज्यांस विभक्ति लागतात, ते **सविभक्तिक** शब्द जसें—रामा, घर, मीं, तूं, जाणें, येणें, इ०.

४०. ज्या शब्दांवरून विभक्तींचीं कार्यें होत नाहींत, ह्मणजे ज्यांस विभक्ति लागत नाहींत, ते **अविभक्तिक** शब्द (अथवा **अव्ययें**) जाणावीं; जसें—आणि, जर, सटकन, खालीं, वर, जात, येत, इ०.

४१. मराठी भाषेंत शब्दांच्या आठ जाती आहेत; त्यांत

सविभक्तिकांत चार; नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद; आणि अविभक्तिकांत अथवा अव्ययांत चार;—क्रियाविशेषण, उभयान्वयी, शब्दयोगी, आणि केवलप्रयोगी.

४२. **नाम** ह्मणजे प्रत्येक पदार्थाचें नांव; जसें—माणूस, पोथी, लेखणी, राग, मन, इ०.

४३. **सर्वनाम** ह्मणजे नामाचा वारंवार उच्चार न व्हावा ह्मणोन केव्हां केव्हां त्या नामाच्या ठिकाणीं जो शब्द येतो तो; जसें-मीं, तूं, हा, जो, असें, कोण, इ०.

४४. **विशेषण** ह्मणजे नामाचा गुण दाखविणारा जो शब्द तो; जसें—बरा, वाईट, काळा, गोरा, लंगडा, शहाणा, मूर्ख, इ०.

४५. **क्रियापद** ह्मणजे ज्या शब्दें करून कोणत्याही क्रियेचा अथवा स्थितीचा बोध होतो तो शब्द; जसें—करणें, बोलणें, चालणें, निजणें, असणें, इ०.

४६. **क्रियाविशेषण** ह्मणजे ज्या शब्दें करून क्रियांच्या गुणांचा अथवा प्रकारांचा बोध होतो तो शब्द; जसें—हळू, झटकन, लौकर, फडफड, इ०.

४७. **उभयान्वयी** ह्मणजे ज्या शब्दाच्या योगें करून दोन शब्द अथवा दोन वाक्यें यांचा अन्वय होतो तो शब्द; जसें—आणि, व, जर, तर, परंतु, इ०.

४८. **शब्दयोगी** ह्मणजे ज्या शब्दाचा प्रयोग नामवाचक शब्दा वरून होतो, आणि ज्या नामवाचक शब्दाशीं याचा संबंध असतो त्याचें याच्या योगानें सामान्यरूप होतें; जसें—वर, खालीं, कडे, मध्यें, पुढें, मागें,

समोर, इ०. यांत शुद्धशब्दयोगी अव्यय ह्मणोन एक उपभेद आहे त्याच्या योगानें हें सामान्यरूप होत नाहीं.

४९. केवलप्रयोगी ह्मणजे ज्या शब्दाच्या योगानें मनाच्या उद्गाराचा बोध होतो तो शब्द; असें—अहा, छिः, वाहवा, अं, बबब, इ०.

(अ) नामविचार.

५०. नाम ह्मणजे प्रत्येक पदार्थाचें नांव; जसें—मनुष्य, पोथी, लेखणी, राग, मन, इ०.

मग त्या पदार्थांचें ज्ञान इंद्रियांस होऊ, अथवा मनासच होऊ. घोडा प्रत्यक्ष डोळ्यानें पाहतां येतो, शब्द कानानें ऐकता येतो, गोडा जिभेनें कळत्यें; परंतु—आनंद, दुःख, लोभ, हेवा, हे मनाचे विकार मनासच समजतात, तथापि हीं सारीं नामें होत

५१. नामांत सामान्य, विशेष, आणि भाववाचक, असे तीन भेद आहेत.

५२. सामान्य नाम ह्मणजे जातिवाचक शब्द, ज्यांत त्या जातीचा धर्म अनेकां वर असतो; जसें—मनुष्य, झाड, जनावर, घर, इ०.

यांत मनुष्य ह्मटलें ह्मणजे सारीं मनुष्यें, एकच मनुष्य नाहीं हा जातिवाचक शब्द होय

५३. विशेष नाम ह्मणजे एक एक व्यक्तीचा वाचक जो शब्द तो; असें—रामा, गोविंदा, काशी, गंगा, इ०.

यांत—रामा, गोविंदा, गंगा, ही एक एक व्यक्ति होय. ठेविलेलीं जितकीं नामें तितकीं सारीं विशेष नामें जाणावीं.

५४. पदार्थाचा भाव अथवा धर्म ज्या नामांनीं जाणिला जातो तीं सारीं भाववाचक नामें जाणावीं; जसें-मनुष्यपण, देवपण, नीचपण, माणुसपणा, मोठाई, गुलामी, शत्रुत्व, मित्रत्व,

रसिकता, कोमलता, क्रौर्य, माधुर्य, इ०. (हे साधित शब्द जाणावे.)

५५. नामांस लिंग, वचन, आणि विभक्ति, हीं असतात.

लिंगविचार.

५६. नाममात्रास लिंग असतें. लिंगें तीन आहेत.— **पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग.**

५७. ज्या नामा वरून पुरुष जातीचा बोध होतो, अथवा ज्यास तो हें सर्वनाम लागतें, त्या नामाचें **पुल्लिंग** जाणावें; अथवा तीं नामें पुल्लिंगीं आहेत असें ह्मणावें; जसें—पुरुष, घोडा, बैल, आंबा, खांब, पेरू, इ०.

५८. ज्या नामा वरून स्त्रीजातीचा ह्मणजे बायको जातीचा बोध होतो, अथवा ज्यास ती हें सर्वनाम लागतें, त्या नामाचें **स्त्रीलिंग** जाणावें; अथवा तीं नामें स्त्रीलिंगीं आहेत असें ह्मणावें; जसें—बायको, गाय, घोडी, चिंच, दऊत, लेखणी, इ०.

५९. ज्या नामा वरून पुरुष जातीचा अथवा स्त्रीजातीचा बोध होत नाहीं, परंतु बाकी राहिलेल्या नपुंसक जातीचा बोध होतो, अथवा ज्यास तें हें सर्वनाम लागतें, त्याचें **नपुंसकलिंग** जाणावें; अथवा तीं नामें नपुंसकलिंगीं आहेत असें ह्मणावें; जसें—मूल, वासरूं, पाखरूं, घर, पान, फूल, दहीं, लोणी, केळें, इ०.

या भाषेंत निर्जीव पदार्थांचीं वाचक जीं नामें त्यांस अशीं लिंगें मानिलीं आहेत, ह्मणोन नामांनीं लिंगें समजणें कठीण पडतें.

६०. हीं लिंगें समजण्याची सोपी रीत अशी आहे कीं, ज्या नामाच्या मागें तो हें सर्वनाम लागतें त्यांचें पुल्लिंग, ती

लागतें त्याचें स्त्रीलिंग, आणि तें लागतें त्याचें नपुंसकलिंग; जसें—तो आंबा, ती लेखणी, तें घर, इ०.

६१. कित्येक प्राणिवाचक पुल्लिंग नामांस पुढे ईण प्रत्यय लाविला म्हणजे त्याच प्राण्याच्या स्त्रीजातीचीं वाचक अशीं नामें होतात; जसें—

पु०	स्त्री०
सुतार	सुतारीण.
सोनार	सोनारीण.
वाघ	वाघीण.
सिंह	सिंहीण.

६२. तीं पुल्लिंग नामें आकारान्त असलीं तर स्त्रीलिंगीं ई, आणि नपुंसकलिंगीं एँ, हे त्यांस प्रत्यय लागतात; जसें—

पु०	स्त्री०	न०
मुलगा	मुलगी	मुलगें.
कुत्रा	कुत्री	कुत्रें.
लांडगा	लांडगी	लांडगें.
बकरा	बकरी	बकरें.
इ०.	इ०.	इ०.

वचनविचार

६३. वचनें दोन आहेत—एकवचन आणि अनेकवचन अथवा बहुवचन.

६४. ज्या नामाची एक संख्या असत्ये त्याचें एकवचन; जसें—मुलगा, घोडा, पागोटी, केळें, नारिंग, इ०.

६५. ज्या नामाची एका पेक्षां अधिक संख्या असत्ये

त्याचें अनेकवचन; जसें—मुलगे, घोडे, पागोट्या, केळीं, नारिंगें, इ०.

६६. या भाषेंत नामाच्या अंत्य ह्मणजे शेवटल्या स्वरावरून एकवचनांतले शब्द अनेकवचनांत आणितात; जसें—

	एकवचन.	अनेकवचन.	
पुल्लिंग.	खांब, वाघ, सुतार,	खांब, वाघ, सुतार.	पुल्लिंग.
	बकरा, मेंढा, आंबा,	बकरे, मेंढे, आंबे.	
	न्हावी, तेली, कोळी,	न्हावी, तेली, कोळी.	
	पेरू, लाडू, परभू,	पेरू, लाडू, परभू.	
	टाहो, लाहो, डोहो,	टाहो, लाहो, डोहो.	
स्त्रीलिंग.	आत, वेळ, सून,	आता, वेळा, सुना.	स्त्रीलिंग.
	खीळ, भित, जर,	खिळी, भिती, जरी.	
	पागा, जागा, टीका,	पागा, जागा, टीका.	
	रीति, रुचि, भक्ति,	रीति, रुचि, भक्ती.	
	काठी, नदी, चुलती,	काठ्या, नद्या, चुलत्या.	
	सासू, जळू, जाऊ,	सास्वा, जळवा, जावा.	
	बायको,...............	बायका...............	
नपुंसकलिंग.	घर, फूल, देऊळ,	घरें, फुलें, देउळें.	नपुंसकलिंग.
	मिरीं, मोतीं, केंबरी,	मिऱ्यें, मोत्यें, केंबऱ्यें.	
	वासरूं, पाखरूं, पारडूं,	वासरें, पाखरें, पारडें.	
	तारूं, आसू, गळूं,	tarवें, आस्वें गळवें.	
	भांडें, तळें, बोलणें,	भांडीं, तळीं, बोलणीं.	

६७. ज्या नामांचे उपांत्य ह्मणजे शेवटल्या वर्णाच्या अलीकडले स्वर (दीर्घ) ईकार अथवा दीर्घ ऊकार असतात,

त्यांच्या अनेकवचनीं ते उपांत्य स्वर ऱ्हस्व होतात; अथवा कोठें कोठें त्या उपांत्याच्या जागीं अ आदेश होतो; जसें—

एकव०	अनेकव०
परमीण	परमिणी.
बटीक	बटिकी, बटकी.
कुंमारीण	कुंमारिणी, कुंमारणी.
कोंशिबीर	कोंशिबिरी, कोंशिबरी.

६८. जर तो उपांत्य स्वर केवळ ई अथवा ऊ असला, तर विकल्पें ई च्या जागीं य, आणि ऊ च्या जागीं व, असे आदेश होतात; जसें—

एकव०	अनेकव०
बाईल, ताईत	बाइली, बायली; ताइती, तायती.
कऊल, देऊळ	कउलें, कवलें; देउळें, देवळें.

(या वचनप्रकरणीं आणखी बारीक नियम पुष्कळ आहेत, ते पहायाचे असल्यास माझें मोठें व्याकरण पहावें.)

विभक्तिविचार.

६९. कोणत्याही नामाचा इतर नामांशीं अथवा क्रियेशीं संबंध दाखवायाचा असतां त्यास आठ विभक्तींतून एक विभक्ति असत्ये; त्यांचीं नावें, आणि त्यांचे प्रत्यय, पुढें दाखविल्या प्रमाणें जाणावे.—

विभक्ति. प्रत्यय.

एकव० अनेकव०

प्रथमा. ही विभक्ति असतां (प्रायः एकवचनीं व क्वचित्

अनेकवचनीं) नामाचें मूळचें रूप तसेंच राहतें.

द्वितीया.	स. ला. तें.	स. ला. नां. तें.
तृतिया.	नें. एँ. शीं.	नीं. हीं. ईं. शीं.
चतुर्थी.	स. ला.	स. ला. नां.
पंचमी.	ऊन. हून.	ऊन. हून.
षष्ठी.	चा. ची. चें.	चा. ची. चें.
सप्तमी.	तँ. ईं. आँ.	तँ. ईं. आँ.

संबोधन. नामांच्या अंत्य स्वरावरून या विभक्तीचीं रूपें निरनिराळीं होतात. अनेकवचनीं या रूपास नों हा प्रत्यय लागतो.

आतां नामास हे प्रत्यय लावून विभक्तींचीं रूपें दाखवितों.

विभक्ति.	एकव०	अनेकव०
प्रथमा.	वाघ.	वाघ.
द्वितीया.	वाघास—ला—तें.	वाघांस-ला-नां-तें.
तृतीया.	वाघानें—शीं.	वाघांनीं—हीं—शीं.
चतुर्थी.	वाघास—ला.	वाघांस—ला—नां.
पंचमी.	वाघाहून.	वाघांहून.
षष्ठी.	वाघाचा—ची—चें.	वाघांचा—ची—चें.
सप्तमी.	वाघाँत.	वाघाँत.
संबोधन.	वाघा.	वाघांनों.

७०. नामाच्या लिंगाप्रमाणें आणि अंत्य स्वराप्रमाणें त्याच्या अंत्य स्वरास विकार होऊन विभक्तींचीं रूपें साधतात; जसें—

पुल्लिंग.

घोडा-घोड्यास-ला; घोड्यानें-शीं; घोड्याचा-ची; इ०.
रवि रवीस-ला; रवीनें शीं; रवीचा; रवीत; इ०.
तेली तेल्यास-ला;तेल्यानें-शीं;तेल्याहून;तेल्याचा; इ०.
भानु-भानूस-ला; भानूनें-शीं; भानूचा; भानूंत; इ०.
पेरू-पेरूस-ला; पेरूनें-शीं; पेरूचा; इ०
लाडू-लाडवास-ला; लाडवानें शीं; लाडवाचें; लाडवांत; इ०.
तट्टू-तट्टास-ला; तट्टानें-शीं; तट्टाचा; इ०.

स्त्रीलिंग.

आत-आतेस-ला; आतेनें-शीं; आतेचा-ची; अने०-
आतांस-नां; आतांचा ची; इ०.
भिंत-भिंतीस-ला; भिंतीनें-शीं; भिंतीचा; अने०-
भिंतींस-ना; इ०.
जागा-जागेस-ला;जागेनें-शीं;जागेंत; अने०-जागांस;
जागांनीं; जागांत; इ०.
भक्ति-भक्तीस-ला; भक्तीनें-शीं; भक्तींत; इ०.
हवेली-हवेलीस-ला; हवेलीनें-शीं; हवेलीचा-ची; ह-
वेलींत; अने०-हवेल्यांचा; हवेल्यांत; इ०.
धेनु-धेनूस-ला; धेनूनें-शीं; धेनूंत; इ०.
सासू-सास्वेस-ला; सास्वेनें-शीं; अने०-सास्वांचा;
सास्वांत; अथवा-सासूस-ला; सासूनें-शीं;
अने०-सासूंचा; सासूंत; इ०.
बायको-बायकोस-ला; बायकोनें-शीं; अने०-बाय-
कांनीं; बायकांचा; इ०.

नपुंसकलिंग.

घर-घरास-ला; घरानें-शीं; घराचा; घरांत, घरीं; अने०-
घरांचा; घरांत, घरीं; इ०.

पाणी--पाण्यास--ला; पाण्यानें--शीं; पाण्याचा; पा-
ण्यांत; इ०.

तारूं-तार्वास-ला;तार्वानें-शीं;तार्वाचा;अ०तार्वांचें;इ०.

वासरूं--वासरास-ला;वासरानें-शीं;वासराचा; अने०--
वासरांचें: इ०.

भांडें--भांड्यास--ला; भांड्याचा; भांड्यांत; इ०.

७१. नामाचा उपांत्य स्वर (ह्मणजे शेवटल्या वर्णा ज-
वळचा स्वर)जर (दीर्घ)ई अथवा (दीर्घ)ऊ असला तर त्या
उपांत्यास (ऱ्हस्व)इ अथवा (ऱ्हस्व)उ होऊन विभक्तिप्रत्यय
लागतात;कोठें कोठं अ आदेश होतो.आणि जर ते उपांत्य
केवळ ई अथवा ऊ च असले तर त्यांच्या स्थानीं विकल्पें
य आणि व होऊन विभक्तींचीं रूपें साधतात; जसें--

बुरूड--बुरुडास-ला, बुरडास-ला; बुरुडाचा, बुरडाचा;इ०.

लांकूड--लांकडास--ला;लांकडानें--शी; अने० लांकडांला;
लांकडांचा; इ०.

ताईत--ताइतास-ला;तायतास-ला; अने०ताइतांनीं, ताय-
तांनी, इ०.

बाईल--बाइलेस-ला-बायलेस ला;बाइलेचा, बायलेचा;इ०.

दऊत--दउतीस-ला,दवतीस-ला;दउतीचा, दवतीचा; इ०.

देऊळ-देउळास-ला,देवळास-ला;देउळाचा,देवळाचा;इ०.

७२. नामाचा अंत्य वर्ण जर च, ज, झ, (दंत्य)
अथवा स असला तर कित्येक शब्दांत विभक्तीच्या यो-

गानें तो वर्ण अनुक्रमें च, ज, झ, (तालव्य) अथवा श होतो; जसें—

चमचा-चमचास-ला; चमचानें-शीं; अने० चमचांचा; इ०.

राजा—राजास-ला;राजानें-शीं;अने०-राजांचा;राजांत इ०.

कांच—कांचेस ला;कांचेनें शी;कांचेंत; अने०कांचांत; इ०.

मासा—माशास-ला; माशानें-शी;माशाचें अने०-माशांना; माशांनीं; माशांचें; इ०.

भरंवसा—भरंवशाला; भरवशानें; भरंवशाचा; इ०.

७३. द्वितीयादि विभक्तींचे जे वर प्रत्यय सांगितले त्यांच्या ठिकाणीं अव्ययें येऊनही त्या त्या विभक्तींचे अर्थ साधतात. त्यांतून मुख्य अव्ययें सांगतो.—

विभक्तीचे अर्थ सुचविणारीं अव्ययें.

विभक्ति. अव्ययें.

द्वि० प्रत, लागीं. उदाह०-पुरुषा प्रत, पुरुषा लागीं.

तृ० करून, द्वारें, मुळें, कडून. उदाह०—बाणें करून, त्याच्या द्वारें, पुरुषा मुळें, पुरुषा कडून.

च० कारणें, करतां, साठीं, स्तव. उदाह०-पुरुषा कारणें, पुरुषा करतां, पुरुषा साठीं, पुरुषा स्तव.

पं० पेक्षां, पासून,कडून वरून. उदाह०-पुरुषा पेक्षां, पुरुषा पासून, पुरुषा कडून, पुरुषा वरून.

ष० संबंधी. उदाह०-पुरुषा संबंधी.

स० मध्यें, ठायीं, विषयीं. उदाह०-पुरुषा मध्यें, पुरुषा विषयीं; त्याच्या ठायीं.

सं० ए० अरे, अगा, अगे, अने० अहो. उदाह०·अरे पुरुषा, अगा देवा, अगे रमे; अने०अहो मुलांनो.

७४. विभक्तिप्रत्यय लावायाचे पूर्वीं जें शब्दाचें रूप सिद्ध होतें त्यास सामान्यरूप ह्मणतात; जसें—वाघ याचें वाघा, तारूं याचें तारवा, कांच याचें कांचे, गंगा याचें गंगे, सासू याचें सास्वे; हीं सामान्यरूपें जाणावीं.

(हा विभक्तिविचार मोठ्या व्याकरणांत सविस्तर रूपानें केला आहे तो पहावा.)

(आ) सर्वनामविचार.

७५. नामाचा उच्चार वारंवार न व्हावा ह्मणोन त्या नामाच्या ठिकाणीं जो शब्द येतो तें सर्वनाम जाणावें; जसें-मीं, तूं, तो, हा, जो, इ०.

' रामानें बाळास सांगितलें कीं, मी पुस्तक वाचतों तें तूं वाच.' या वाक्यांत मीं, तें, आणि तूं, हे शब्द रामा, पुस्तक आणि बाळा या नामांचा पुनः पुनः उच्चार न व्हावा ह्मणोन आले आहेत हीं सर्वनामें जाणावीं.

७६. सर्वनामाचे पांच भेद आहेत; पुरुष, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक, आणि सामान्य.

७७. पुरुष सर्वनामास तीन पुरुष असतात; प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष, आणि तृतीय पुरुष.

	एकव०	अनेकव०
प्रथम पुरुष.	मीं.	आह्मीं.
द्वितीय पुरुष.	तूं.	तुह्मीं.
तृतीय पुरुष.	तो, ती, तें.	ते, त्या, तीं.

७८. जें सर्वनाम जवळचा अथवा दूरचा पदार्थ दा-खवितें तें **दर्शक सर्वनाम** होय; जसें-' हा घोडा, ' ' तो घोडा; ' यांत हा आणि तो हीं दर्शक सर्वनामें; याच प्रमाणें-इतका, एवढा, असा; तितका, तेवढा, तसा; इ०.

७९. हा, तो, यांचीं स्त्रीलिंगीं ही, आणि ती, आणि नपुंसकलिंगीं हें, आणि तें, अशीं रूपें होतात.

८०. अनेकवचनीं पुल्लिंगीं हे, ते; स्त्रीलिंगीं ह्या अ० या, त्या; आणि नपुंकलिगीं हीं, तीं, अशीं रूपें होतात. याच प्रमाणें इतर शब्दांचा लिंगवचना प्रमाणें रूपें जाणावीं.

८१. जें सर्वनाम दर्शक सर्वनामाशीं संबंध ठेवितें, तें **संबंधी सर्वनाम** जाणावें; जसें-जो, जितकीं, जेवढें, असें. यांचा संबंध नित्य तो, तितकीं, तेवढे, तसें, या दर्शक सर्वनामांशीं असतो; उदाह०-'जो चोरी करितो त्यास दंड होतो,' 'जितके पहावे तितके उद्योगी,' इ०.

८२. प्रश्न करावयाचा असतां जें सर्वनाम येतें तें **प्रश्नार्थक** सर्वनाम जाणावें; जसें-कोण, कोणतीं, काय, कसें, केवढें, कितका, इ०. उदाह०-तो कोण आहे? हें काय आहे? तीं केवढीं मनुष्यें होतीं? इ०.

८३. ज्याचा अर्थ सामान्येंकरून होतो, तें **सामान्य सर्वनाम** जाणावें; जसें-कोणी, अमका, सर्व, अवघा, भलता, कितिएक, इ०.

८४. सर्वनामांस नामा प्रमाणें सर्व विभक्ति लागतात;

आणि त्यांच्या योगानें यांची रूपेंही फार बदलतात, त्यांतून थोडीं खालीं दाखवितों.

विभक्तींचीं रूपें.

मीं—द्वि० च०—मला, मातें; तृ०—मीं अ० म्यां; पं०—मजहून; ष०—माझा; स०—माझ्यांत.

आह्मीं—द्वि० च०—आह्मांला; तृ०—आह्मीं; पं०—आह्मांहून; ष०—आमचा; स०—आमच्यांत.

तूं—द्वि० च०—तुला; तृ०—तूं अ० त्वां; पं०—तुजहून; ष०—तुझा; स०—तुझ्यांत.

तुह्मीं—०द्वि०च०—तुह्मांला; तृ०—तुह्मीं; पं०—तुह्मांहून; ष०—तुमचा; स०—तुमच्यांत.

तो, तें—द्वि०—च०—त्याला; तृ०—त्याणें—नें;पं०—त्याहून; ष०—त्याचा; स०—त्यांत—त्याच्यांत.

ती—द्वि०च०—तिला—तीस;तृ०—तिणें—नें; पं०—तिजहून; ष०—तिचा—चीं; स०—तींत—तिच्यांत.

ते, त्या, तीं—द्वि० च०—त्यांना; तृ०—त्यांहीं—णीं—नीं; पं०—त्यांहून;ष०—त्यांचा;स०—त्यांत—त्यांच्यांत.

हा, हें—द्वि० च०—याला-ह्याला; तृ०—याणें—नें—ह्यानें; पं०—याहून;—ह्याहून;ष०-याचा-ह्याचा;स०-यांत-ह्यांत—याच्यांत—ह्याच्यांत.

ही—द्वि०च०—इला; तृ०—इणें; पं०—इजहून; ष०—इचा; स०—ईत-इच्यांत. क्वचित् हिला,हिणें,हिचा,इ०.

हे, ह्या अ०या, हीं—द्वि०—च०—यांना;तृ०—यांहीं—णीं;

पं०—यांहून—यांजहून; ष०—यांचा; स०—यांत—यांच्यांत.

कोणी ह्यांला, ह्याणें, ह्यांणीं, हिणें, अशा प्रकारचींही रूपें लिहितात.

या सर्वनामांचीं सामान्यरूपें—मज, तुज, त्याज, तिज, त्याच्या, आमच्या, तुमच्या, इ० अशीं होतात.

(शिक्षकानें मुलांकडून अभ्यास करतांना या अवघ्या सर्वनामांचीं सर्व विभक्तींचीं रूपें लिहवावीं.)

(इ) विशेषणविचार.

८५. नामाचा गुण किंवा त्याची संख्या दाखविणारा जो शब्द तें विशेषण जाणावें; जसें—बरा, वाईट, काळा, गोरा, लंगडा, शाहणा, मूर्ख, इ०.

८६. विशेषण ज्या नामाचा गुण दाखवितें तें नाम त्याचें विशेष्य होय; जसें—'शाहणा मुलगा,' 'लंगडी गाय.' यांत १ ल्या उदाहरणांत शाहणा या विशेषणाचें मुलगा हें विशेष्य होय; आणि २ ऱ्या उदाहरणांत लंगडी या विशेषणाचें गाय हें विशेष्य होय.

८७. मराठींत विशेष्याच्या लिंगवचनां प्रमाणें आकारान्त विशेषणाचें रूप बदलतें; जसें—शाहणा मुलगा, शाहणी मुलगी, शाहणें मुलगें, शाहण्या मुलग्या, शाहणीं मुलगीं, इ०.

आकारान्त म्हटलें या करून अकार, इकारादि स्वर विशेषणाच्या अंतीं असले तर विशेष्याच्या लिंगवचनां प्रमाणें त्या विशेषणाचीं रूपें न बदलतां जशींचीं तशींच राहतात; जसें—सुंदर घोडा, सुंदर चित्र, लाल फुलें, मोठ्या खिडक्या, इ०.

८८. जर विशेष्याचें रूप सविभक्तिक असलें तर त्याच्या विशेषणास ती विभक्ति न लागतां त्याचें नुसतें सामान्यरूप राहतें; जसें—शाहण्या मुलास, शाहण्या अ॰ शाहणे मुलीचा, तांबड्या फुलांनीं, इ॰.

वरील विशेषणांस गुण विशेषणें म्हणतात.

८९. संख्या दाखविणारीं जीं विशेषणें तीं संख्याविशेषणें, जाणावीं; जसें—एक, दोन, पांच, शंभर, हजार, इ॰. या विशेषणांत क्रमवाचक, संख्यांशवाचक, आणि आवृत्तिवाचक, असे आणखी भेद आहेत. संख्येंत क्रम दाखवितें तें क्रमवाचक संख्याविशेषण; जसें-पहिला, दुसरा, पांचवा, दाहवा, इ॰; संख्येचा अंश दाखवितें तें संख्यांशवाचक संख्याविशेषण; जसें—अर्धा, पाव, पाऊण, दीड, अडीच, साडेसात, इ॰; आणि आवृत्ति दाखवितें तें आवृत्तिवाचक संख्याविशेषण; जसें—दुप्पट, तिप्पट, चौपट, दसपट, द्विगुणित, शतगुणित, इ॰.

(ई) क्रियापदविचार.

९०. ज्या शब्देंकरून कोणत्याही क्रियेचा अथवा स्थितीचा बोध होतो तें क्रियापद जाणावें; जसें—करणें, बोलणें, चालणें, निजणें, असणें, इ॰.

९१. क्रियापदाचे आठ भेद आहेत, त्यांत अर्थावरून पांच—सकर्मक, अकर्मक, उभयविध, भावकर्तृक, आणि सहाय; आणि रूपा वरून तीन—शक्य, प्रयोजक, गौण अ॰ सिद्ध.

९२. ज्या क्रियेचा व्यापार कर्त्या पासून निघून दुसऱ्या पदार्था वर घडतो, ती क्रिया दाखविणारें क्रियापद सकर्मक होय; जसें–'बाळा पोथी वाचतो,' यांत वाचणें या क्रियेचा व्यापार बाळा पासून निघोन पोथी वर घडतो, ह्मणोन वाचतो हें सकर्मक क्रियापद. तसेंच–मारितो, करितो, बोलतो, लिहितो, फोडितो, जोडितो, इ॰. हीं सकर्मक क्रियापदें जाणावीं.

९३. एखाद्या क्रियेचा व्यापार कर्त्या पासून निघोन ज्या दुसऱ्या पदार्था वर घडतो, तें त्या क्रियापदाचें कर्म होय, आणि ज्या पासून तो व्यापार निघतो तो कर्ता; जसें–'रामा पोथी वाचतो,' यांत रामा पासून वाचण्याची क्रिया निघोन ती पोथी वर घडत्ये, ह्मणोन रामा हा वाचतो या क्रियापदाचा कर्ता, आणि पोथी हें कर्म होय.

९४. ज्या क्रियेला या प्रमाणें कर्म नसतें, ह्मणजे जिचा व्यापार कर्त्या वरच असतो, तें अकर्मक जाणावें; जसें—'बाळा असतो,' यांत असण्याचा व्यापार बाळासच धरून राहतो. तसेंच–निजतो, धांवतो, उठतो, इ॰. यांत केवळ स्थितीचाच बोध होतो.

सकर्मक आणि अकर्मक क्रियापदें ओळखायाची बहुधा सुगम रीति अशी आहे कीं, ज्यास भविष्य काळीं तृतीय पुरुषीं एकवचनी 'ईल' प्रत्यय लागतो तें सकर्मक आणि 'एल' लागतो तें अकर्मक क्रियापद, असें—करील, मारील, लिहील, वाचील, इ॰ हीं सकर्मक, आणि असेल, निजेल, बसेल, फुटेल, हंसेल, इ॰ हीं अकर्मक क्रियापदें जाणावीं.

(हीं सकर्मक आणि अकर्मक क्रियापदें ओळखायाच्या आणखीही रीति आहेत, त्या सविस्तर पाहणें असल्यास माझें मोठें व्याकरण पाहावें.)

९५. क्रियापदाचें जें मूळचें रूप त्यास धातु ह्मणतात.

९६. कित्येक धातु सकर्मक असतात, आणि अकर्मकही असतात, त्यांस उभयविध धातु ह्मणावें; जसें—मोडणें याचें सकर्मक उदाहरण,-' त्याणें आपलें घर मोडिलें', आणि अकर्मक उदाहरण,–'त्याचें घर मोडलें'; याच प्रमाणें–उघडणें, झांकणं, इ°.

९७. अकर्मक क्रियापद असून जेथें क्रियेचा भाव ह्मणजे मूळ अर्थ तोच कर्ता असतो, व ज्याचा प्रयोग तृतीय पुरुषीं एकवचनीं मात्र होतो, तेथें तें भावकर्तृक क्रियापद जाणावें; जसें—कळमळतें, सांजावलें, फावलें, इ°.

९८. जें क्रियापद धातूच्या रूपांशीं योजिलें असतां त्याचा काळ-व अर्थ फिरवितें तें सहाय क्रियापद जाणावें; जसें–अस, नस, हो, जा, ये, दे, लाग, बस, पाहिजे, नको, नये, नलगे, इ°.

९९. ज्या क्रियापदाच्या रूपांत शक्तीचा अर्थ असतो, तें शक्य क्रियापद जाणावें; जसें–'हें काम माझ्यानें करवतें,' ह्मणजे हें काम करायाची मला शक्ति आहे, हें मजकडून करविलें जातें, असा अर्थ; तसेंच-देववतें, घेववतें, जाववतें, इ°.

हीं क्रियापदें मूळ धातूस 'वणें' आणि 'ववणें' प्रत्यय लागून सिद्ध होतात. यांत एकाक्षरी धातूस 'ववणें' प्रत्यय लागतो.

१००. मूळ कर्ता एक असून दुसऱ्या कडून एखादी क्रिया घडविण्याचा अर्थ जेव्हां मूळ धातूस प्रत्यय लागून उत्पन्न होतो, तेव्हां त्या क्रियापदास प्रयोजक क्रियापद ह्मणावें; जसें–'रामा गोपाळा कडून तें काम करवितो,'

यांत **करवितो** हें **प्रयोजक** क्रियापद जाणावें; तसेंच—**नेसवितो, लिहवितो, मारवितो,** इ०.

यात मूळ धातूस 'विणें' अथवा 'इवणें' हा प्रत्यय लागतो, जर जो मूळ धातु 'ह'कारवर्जित एकाक्षरी असला तर 'पिवणें' प्रत्यय लागतो; जसें-खाविणें, लिहविणें, गाविणें, नेविणें, घेविणें, इ०. आणि अनेकाक्षरी असला तर 'इवणें,' जसें—करविणें, बोलिवणें, बदलिवणें, इ०.

१०१. सहाय धातूंतून ज्यांचीं रूपें मूळचीं सिद्ध असतात, आणि जीं नियमित अर्थीं, नियमित काळीं, आणि नियमित पुरुषीं मात्र साधतात, त्यांस **गौण** अ० **सिद्ध** क्रियापदें ह्मणतात; तीं—**पाहिजे, नको, नलगे,** आणि **नये** हीं होत.

१०२. क्रियापदास **रूप, भेद, अर्थ, प्रयोग, काळ, पुरुष, लिंग,** आणि **वचन** हीं असतात.

१०३. कोणत्याही धातूस 'होय' अथवा 'नाहीं' या अर्थानें चालविलें असतां जो त्यांत फेरफार होतो त्यास **रूप** ह्मणावें. हीं रूपें दोन प्रकारचीं आहेत—**करणरूप,** आणि **अकरण रूप;** उदाहरण, मीं—आहें, होतों, करितों, केलें, करीन, हें **करण रूप;** आणि मीं—नाहीं, नव्हतों, करित नाहीं, केलें नाहीं, करणार नाहीं, हें **अकरण रूप.**

१०४. अर्थाच्या भेदानें मूळ धातूच्या रूपांत विकार होऊन जो नवा क्रियारूप शब्द सिद्ध होतो तो भेद जाणावा. हे भेद तीन आहेत-**मूळरूप भेद, प्रयोजक भेद,** आणि **शक्य भेद;** जसें—'मीं करितों, 'म्यां केलें,' 'मीं करीन,' हा **कर** धातूचा वर्तमान, भूत, आणि भविष्यकाळीं **मूळरूप भेद;** 'मीं करवितों,' 'म्यां करविलें,' 'मीं करवीन,' हा त्याच काळीं **प्रयोजक भेद;** आणि

'माझ्यानें-करवतें, करवलें, करवेल,' हा तिन्हीं काळीं **शक्य भेद.**

१०९. एकादी क्रिया करण्या विषयींचा कर्त्याच्या मनांतला निरनिराळा भाव जेणें करून कळतो, अशीं जीं क्रियापदाचीं रूपें, त्यास **अर्थ** ह्मणावें. हे अर्थ पांच आहेत- **स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ,** आणि **संशयार्थ.**

(अ) जेथें बोलणारा नुसतें होय किंवा नाहीं सांगतो तेथें **स्वार्थ** जाणावा; जसें-'तो करितो,' 'त्याणें केलें,' 'तो करणार नाहीं,' 'तो गेला नाहीं,' इ०.

(आ) जेथें बोलणारा आज्ञा, उपदेश, अथवा प्रार्थना करितो तेथें **आज्ञार्थ** जाणावा; जसें 'रामा हें काम कर,' 'मुलानों, तुह्मीं खोटें बोलूं नका,' 'बाबा मला एक पुस्तक घेऊन द्या,' यांत 'कर,' 'बोलूं नका,' आणि 'घेऊन द्या,' इ०.

(इ) जेथें क्रियापदाच्या रूपा पासून धर्म, शक्यता, योग्यता, इ०. अर्थ निघतात, तेथें **विध्यर्थ** जाणावा; जसें— 'त्याणें करावें,' 'म्या नावें,' 'तुह्मीं त्यास मारूं नये,' इ०.

'त्याणें करावें' ह्मणजे करणें हा त्याचा धर्म आहे, करण्याची त्यास मोकळीक आहे, करणें त्यास योग्य आहे, असे अनेक अर्थ उत्पन्न होतात. 'त्या लहानपणीं आईस नित्य भास यावा'—एथें रीति, मागल्या गोष्टीचें स्मरण; 'आता पाऊस पडावा' एथें अटकळ; असे आणखीही अर्थ निघतात.

(ई) अमुक केलें तर अमुक होईल अशा संकेताचा अर्थ जेव्हां क्रियापदाच्या रूपा पासून निघतो, तेव्हां तेथें **संकेतार्थ** जाणावा; जसें—'तो मला पत्र लिहिता, तर मीं जातों,' 'त्याणें माझें काम केलें असतें, तर म्यां त्याचें काम केलें असतें.' इ०.

(उ) जेव्हां क्रियापदाच्या रूपा वरून संशयाचा अर्थ निघतो तेव्हां त्याचा **संशयार्थ** जाणावा; जसें–'तो बोलला असेल,' 'ती जात असली तर बरें,' इ०.

१०६. जेथें वाक्यांत कर्ता, कर्म, आणि भाव, यांच्या लिंगवचना वरून क्रियापदाचें रूप फिरतें, तेथें त्या विकारास **प्रयोग** असें ह्मणतात; उदाह०—'रामा करितो,' 'गाय दूध देत्ये,''तो गेला,' 'त्याणें पुस्तक वाचिलें,''त्याणें पोथी लिहिली,''त्याणे त्यास मारिले,''रामाला बलाविलें,' 'मला वाटतें', 'त्यास तेथेंच सांजावले,' इ०. या वाक्यांत निरनिराळे प्रयोग आहेत.

प्रयोग चार आहेत–**कर्तरिप्रयोग**, **कर्मणिप्रयोग**, **भावीप्रयोग**, आणि **भावकर्तरिप्रयोग**.

(अ) जेथें कर्त्याच्या लिंगवचना वरून क्रियापदाचें रूप फिरतें, तेथें **कर्तरिप्रयोग** जाणावा; जसें–'रामा निजतो ,' 'गंगा आली,' 'मुलगें रडतें,' 'शेळ्या चरतात,' 'घोडें धांवलें,' इत्यादि.

(क्रियापद सकर्मक किंवा अकर्मक असेल त्या प्रमाणें या प्रयोगाचे सकर्मक कर्तरि व अकर्मक कर्तरि असे भेद होतात.)

(आ) जेथें कर्माच्या लिंगवचना वरून क्रियापदाचें रूप फिरतें, तेथें **कर्मणिप्रयोग** जाणावा; जसें–'त्याणें पुस्तक वाचिले,' 'म्यां घोडा बांधिला,' ' तिणें रांगोळ्या घातल्या,' इ०.

(इ) जेथें कर्त्या वरून अथवा कर्मा वरून क्रियापदाचें रूप न फिरतां केवळ सामान्येंकरून त्याचें रूप नपुंसकलिंगीं एकवचनीं असतें, तेथें **भावीप्रयोग** जाणावा;जसें–

'त्याणें त्यास मारिलें,' 'तिणें तिला धरावें,' 'म्यां त्यास बलाविलें असतें,' 'म्यां बसावें,' इ०.

(ई) जेथें क्रियेचा जो भाव तोच कर्ता दिसतो, आणि क्रियापदाचें रूप निरंतर नपुंसकलिंगी एकवचनीं असतें, तेथें **भावकर्तरिप्रयोग** जाणावा; जसें–'मला कळमळतें,' 'त्यांस तेथेंच सांजावलें,' 'तुला फावलें तर तूं जा,' इ०.

कालविचार.

१०७. क्रियापदाच्यारूपा वरून ती क्रिया अमक्या काळीं घडली असा जो बोध होतो, त्यास **काळ** असें म्हणावें. मुख्य काळ तीन आहेत–**वर्तमान**, **भूत**, आणि **भविष्य**. परंतु या प्रत्येकांत आणखी भेद आहेत.

१०८. जो सध्यां चालत आहे तो, अथवा ज्या काळीं एकादी क्रिया घडत्ये तो, त्या काळीं त्या क्रियेचा **वर्तमान काळ**; जसें-'मीं करितों,' 'तो जातो,' 'ती पाहत्ये,' 'त्या मुली उड्या मारितात,' 'जेव्हां तो लिहितो असें म्यां पाहिलें,' इ०.

१०९. जो मागें गेला तो **भुत काळ**; जसें-'म्यां केलें,' 'तो गेला,' 'तिणें पाहिलें,' 'त्या मुलींनी चित्रें काढिलीं,' इ०.

११०. पुढें येणारा तो **भविष्य काळ**; जसें-'मीं करीन,' 'तो जाईल,' 'ती पाहील,' 'त्या मुली खेळतील,' इ०.

१११. वर्तमान काळाचे तीन भेद आहेत-**वर्तमान**, **अपूर्णवर्तमान**, आणि **रीतिवर्तमान**.

उदाहरणें.

मीं करितों................................ वर्तमान.

मीं करित आहें; मीं करितो आहे.... अपूर्णवर्तमान.

मीं करित असतों.................... रीतिवर्तमान.

११२. भूत काळाचे सात भेद आहेत;-भूत, वर्तमानभूत, भूतभूत, अपूर्णभूत, रीतिभूत, पूर्णभूत, आणि भविष्यभूत.

उदाहरणें.

मीं अ० म्यां केलें........................ भूत.
मीं अ० म्यां केलें आहें.................. वर्तमानभूत.
मीं अ० म्यां केलें होतें.................. भूतभुत.
मीं करित होतो.......................... अपूर्णभूत.
मीं करी, अ०करित असें.................. रीतिभूत.
मी करिता झालो......................... पूर्णभूत.
मी करणार होतो......................... भविष्यभूत.

११३. भविष्य काळाचे पांच भेद आहेत;—भविष्य, अपूर्ण भविष्य, वर्तमानभविष्य,भूतभविष्य, आणि भविष्यभविष्य.

उदाहरणें.

मीं करीन............................ भविष्य.
मीं करित असेन..................... अपूर्णभविष्य.
मीं करणार आहे..................... वर्तमानभविष्य.
मीं केलें असेन..................... भूतभविष्य.
मीं करणार असेन.................... भविष्यभाविष्य.

पुरुष, लिंग, आणि वचन विचार.

पुल्लिंग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्रथम.	मीं करितों.	आम्हीं करितों.
द्वितीय.	तूं करितोस.	तुम्हीं करितां.
तृतीय.	तो करितो.	ते करितात.

स्त्रीलिंग.

पुरुष	एकव०	अनेकव०
प्र०	मीं करित्यें.	} वरच्या प्रमाणें.
द्वि०	तूं करित्येस-तीस,	
तृ०	ती करित्ये–[१]ती.	त्या करितात.

नपुंसकलिंग.

पुरुष	एकव०	अनेकव०
प्र०	मी करितें.	} वरच्या प्रमाणें.
द्वि०	तू करितेंस.	
तृ०	तें करितें,	तीं करितात.

यांत प्रथम आणि द्वितीय पुरुषांच्या रूपांचा प्रयोग करण्याचा प्रसंग येत नाहीं.

धातुरूपें.

११४. अस, नस, आणि हो, या सहाय धातूंच्या योगानें क्रियापदाचे काळ आणि रूपें फिरतात; म्हणोन प्रथम या सहाय धातूंची रूपें चालवून दाखवितों.

---

(१) यात द्वितीय आणि तृतीय पुरुषाचीं ही दुसऱ्या प्रकारचीं रूपें निवळ देशस्थ लोकांत आढळतात

अस धातु—करण रूप, स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमान काळ.

प्रकार १ ला.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मी आहें.	आह्मीं आहों.
द्वि०	तूं आहेस.	तुम्हा आहांत-आहां.
तृ०	तो-ती-तें आहे.	ते त्या-ती आहेत.

यांत आहांत, आहां, यांची बहुधा अहांत, अहां, अशींच रूपें लिहितात.

प्रकार २ रा.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं होई	आम्हीं होऊं.
द्वि०	तूं होस—होईस.	तुम्हीं व्हा.
तृ०	तो—ती-तें होय.	ते—त्या—तीं होत.

पुल्लिंग.

प्रकार ३ रा.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं असतों.	आम्हीं असतों.
द्वि०	तूं असतोस.	तुम्ही असता—तां.
तृ०	तो असतो.	ते असतात.

स्त्रीलिंग.

प्र०	मीं असत्यें.	वरच्याप्रमाणें.
द्वि०	तूं असत्येस,अ०असतीस.	

मागच्या पानांतील टीप पहा.

तृ०	ती असत्ये. अ० असती.	त्या असतात.	

नपुंसकलिंग.

पु०	ए०	अ०
प्र०	मीं असतें.	वरच्याप्रमाणें.
द्वि०	तूं असतेस.	
तृ०	तें असतें.	तीं असतात.

हीं रूपें रीति, नित्यत्व या अर्थी येतात.

भूतकाळ

प्रकार १ ला.

पुल्लिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं होतों.	आम्हीं होतों.
द्वि०	तूं होतास.	तुह्मीं होतेत—होतां.
तृ०	तो होता.	ते होते.

या वरून इतर लिंगांचीं रूपें आणावीं.

प्रकार २ रा.

पुल्लिंग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं असलों.	आह्मीं असलों.
द्वि०	तूं असलास.	तुह्मीं असलेत, असलां.
तृ०	तो असला.	ते असले.

स्त्रीलिंग.

पु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं असल्यें.	आह्मीं असलों.

---

१ मागील टीप पहा.

द्वि०	तूं असलीस	तुह्मीं असल्यात.
तृ०	ती असली.	त्या असल्या.

नपुंसकलिंग.

पु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं असलें.	आह्मीं असलों.
द्वि०	तूं असलेंस.	तुम्हीं असलींत.
तृ०	तें असलें.	तीं असलीं.

हीं दुसऱ्या प्रकारचीं रूपें संशयार्थी व संकेतार्थी देखील येतात.

भविष्य काळ.

पुल्लिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं असेन.	आह्मीं असूं.
द्वि०	तूं असशील.	तुम्ही असाल.
तृ०	तो–ती–तें असेल.	ते–त्या–तीं असतील.

नस धातु—अकरण रूप—स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमानकाळ.

प्रकार १ ला.

पुरुष.	एकव०	अनेक०
प्र०	मीं नाहीं.	आम्हीं नाहीं.
द्वि०	तूं नाहींस.	तुम्हीं नाहींत.
तृ०	तो–ती–तें नाहीं.	ते–त्या–तीं नाहींत.

प्रकार २ रा.

पु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नव्हें.	आम्हीं नव्हों.
द्वि०	तूं नव्हेस—नव्हस.	तुम्हीं नव्हां--नव्हेत-नव्हत.
तृ०	तो—ती—तें नव्हे.	ते-त्या-तीं नव्हेत, अ० नव्हत.

प्रकार ३ रा.

पुल्लिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नसतों.	आम्हीं नसतों.
द्वि०	तूं नसतोस.	तुम्हीं नसतां.
तृ०	तो नसतो.	ते नसतात.

स्त्रीलिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मी नसत्यें.	} वरच्याप्रमाणें.
द्वि०	तूं नसत्येस—तीस.	
तृ०	ती नसत्ये--ती.	त्या नसतात.

नपुंसकलिंग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नसतें.	} वरच्याप्रमाणें.
द्वि०	तूं नसतेंस.	
तृ०	तें नसतें.	तीं नसतात.

---

(१) पृ० २९ एथील टीप पहा.

भूतकाळ.

प्रकार १ ला.

पुल्लिंग.

पु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नव्हतों.	आह्मीं नव्हतों.
द्वि०	तूं नव्हतास.	तुह्मीं नव्हतेत--नव्हतां.
तृ०	तो नव्हता.	ते नव्हते.

या वरून इतर लिंगांचीं रूपें जाणावीं.

प्रकार २ रा.

पुल्लिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नसलों.	आह्मीं नसलों.
द्वि०	तूं नसलास.	तुम्हीं नसलेत-नसलां.
तृ०	तो नसला.	ते नसले.

या वरून इतर लिंगांचीं रूपें जाणावीं.

भविष्यकाळ.

पुरुष	एकव०	अनेकव०
प्र०	मीं नसेन.	आम्हीं नसूं.
द्वि०	तूं नसशील.	तुम्हीं नसाल.
तृ०	तो-ती-तें नसेल.	ते-त्या तीं नसतील.

हो धातू करणरूप, स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमानकाळ.

पुल्लिंग.

पुरुष	एकव०	अनेकव०
प्र०	*मीं होतों.	आम्हीं होतों.
द्वि०	तूं होतोस.	तुम्हीं होतां.
तृ०	तो होतो.	ते होतात.

स्त्रीलिंग.

	एकव०	अनेक०
प्र०	मी होत्यें.	} वरच्याप्रमाणें.
द्वि०	तूं होत्येस-तीस.	
तृ०	ती होत्ये—ती.	त्या होतात.

नपुंसकलिंग.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं होतें.	} पुल्लींगाप्रमाणें.
द्वि०	तूं होतेंस.	
तृ०	तें होतें.	तीं होतात.

भूत काळ.

पुंल्लिंग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं झालों.	आह्मीं झालों.

---

*या रूपांपैकीं कांहीं रूपें 'अस' धातूच्या भूतकाळाच्या रूपासारखी आहेत ही गोष्ट विद्यार्थ्यानें लक्ष्यांत ठेवावी.

द्वि०	तूं झालास.	तुह्मीं झालेत-झालां.
तृ०	तो झाला.	ते झाले.

स्त्रीलिंग.

पु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं झाल्यें.	आम्हीं झालों.
द्वि०	तूं झालीस.	तुम्हीं झाल्यात-लां.
तृ०	ती झाली.	त्या झाल्या.

स्त्रीलिंगीं—असल्यें, असल्यें, नसल्यें, नसल्यें, करल्यें, गेल्यें, इ० अशीं, आणि नपुसकलिंगीं—असतें, असलें, नसतें, नसलें, करतें, केलें, गेलें, इ० अशींच रूपें लिहावीं.

(या विषयीचो सविस्तर समजूत माझ्या मोठ्या व्याकरणांत पहावी.)

भविष्य काळ.

	एकव०	अनेकव०
प्र०	मीं होईन.	आम्हीं होऊं.
द्वि०	तूं होशील.	तुम्हीं व्हाल.
तृ०	तो-ती--तें--होईल.	ते--त्या--तीं होतील.

---

११९. आतां विद्यार्थ्यांस कोणत्याही क्रियापदाच्या रूपाचें रूप, भेद, अर्थ, प्रयोग, काळ, इत्यादि समजावें म्हणोन एक धातु घेऊन तो संपूर्ण चालवून दाखविणें फार उपयोगीं आहे, यास्तव तसें करून दाखवितों.

कर धातु—करण रूप—मूळरूप भेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमान काळ.

मीं करितों..............................वर्तमान.

मीं करित आहें, अ० करितों आहें.........अपूर्णवर्तमान.
मीं करित असतों........................रीतिवर्तमान.

भूतकाळ.

कर्मणिप्रयोग.

म्यां केला—ली—लें इ०.....................भूत.
म्यां केला—ली—लें आहें..................वर्तमानभूत.
म्यां केला—ली—लें होतें....................भूतभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करित होतों,.......................अपूर्णभूत.
मीं करीं, अ० करित असे...........रीतिभूत.

रीतिभूत काळाचीं रूपें कांहींशीं विलक्षण होतात, म्हणोन तीं एथें संपूर्ण दाखवितों, या वरून इतर धातूंचीं या काळाचीं रूपें साधावीं.

रीतिभूत काळ.

पुरुष.	एकव.	अनेकव.
प्र०	मीं करीं.	आम्हीं करूं.
द्वि०	तूं करीस	तुम्हीं करा.
तृ०	तो—ती—तें करी.	ते—त्या—तीं करीत.

मीं करिता झालों.......................पूर्णभूत.
मीं करणार होतों.... .. .. भविष्यभूत.

भविष्यकाळ.

मीं करीन............................ भविष्य.
मीं करित असेन...................... अपूर्णभविष्य.
मीं करणार आहें..................... वर्तमानभविष्य.
मीं करणार असेन.................... भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

कर्तरिप्रयोग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मीं करूं.	आम्हीं करूं.
द्वि०	तूं कर.	तुम्हीं करा.
तृ०	तो-ती-तें करू-करो.	ते-त्या-तीं करूत-करोत.

विध्यर्थ.

कर्मणिप्रयोग

म्यां करावा—करावी—करावें, इ०................वर्तमान.
म्यां करित असावा, करित असावी, इ०....अपूर्णवर्तमान.
म्यां करावा होता, करावी होती, इ०; अथवा, } भूत
म्यां करायाचा होता, करायाची होती, इ०. }
म्यां केला असावा, केली असावी, इ०.... वर्तमानभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करणार असावा........................... भविष्य.

संकेतार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं करितों, तूं करितास, तो करिता, इ०........ भूत.
मीं करित असतों, तूं करित असतास, इ०......अपूर्णभूत.

कर्मणिप्रयोग.

म्यां केला असता, केली असती, इ०...,.... भूतभूत.

संशयार्थ.

मीं करित असलों........................ वर्तमान.

कर्मणिप्रयोग.

म्यां केला असला, केली असली, इ०......... भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करणार असलों........................ भविष्य.
मीं करित असेन........................ अपूर्णभविष्य.
मीं केलें असेन .... भूतभविष्य.
मीं करणार असेन........................भविष्यभविष्य.

कर धातू—करण रूप—प्रयोजक भेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं करवितों........................ वर्तमान.
मीं करवित आहें.................... अपूर्णवर्तमान.
मीं करवित असतों.................... रीतिवर्तमान.

कर्मणिप्रयोग.

म्यां करविला-ली-लें इ०................ भूत.
म्यां करविला-ली-लें आहें.............. वर्तमानभुत.
म्यां करविला-ली-लें होतें.............. भूतभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करवित होतों........................अपूर्णभूत.
मीं करवीं, अ० करवित असें..........रीतिभूत.
मीं करविता झालों......................पूर्णभूत.
मीं करविणार होतों....................भविष्यभूत.
मीं करवीन..............................भविष्य.
मीं करवित असेन......................अपूर्णभविष्य.

मीं करविणार आहें.....................वर्तमानभविष्य.
मीं करविणार असेन....................भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

कर्तरिप्रयोग.

पुरुष	एकव.	अनेकव.
प्र०	मीं करवूं?	आम्हीं करवूं?
द्वि०	तूं करीव.	तुम्हीं करवा.
तृ०	तो—ती—तें करवो.	ते-त्या-तीं करवोत.

विध्यर्थ.

कर्मणिप्रयोग.

म्यां करवावा-वी-वें, इ०....................वर्तमान.
म्यां करवित असावा, इ०...................अपूर्णवर्तमान.
म्यां करवावा होता, इ० अथवा
म्यां करवायाचा,अ०करवावयाचा होता इ०. } भूत.
म्यां करविला असावा, इ०................वर्तमानभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करविणार असावा...............................भविष्य.

संकेतार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं करवितों,तूं करवितास,तो करविता,इ०....भूत.
मीं करवित असतों,तूं करवित असतास,इ०....अपूर्णभूत.

कर्मणिप्रयोग.

म्यां करविला असता, करविली असती,इ०...भूतभूत.

संशयार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं करवित असलों......................वर्तमान,

कर्मणिप्रयोग.

म्यां करविला असला,इ०...............भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं करविणार असलों...................भविष्य.

मीं करवित असेन......................अपूर्णभविष्य.

कर्तरिप्रयोग.

मीं करविणार असेन.................... भविष्यभविष्य.

कर्मणिप्रयोग.

म्यां करविला असेल, इ०...............भूतभविष्य.

कर धातु—करण रूप—शक्य भेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

माझ्यानें अ० मला करवते ....वर्तमान.

————करवत आहे..... ....अपूर्ण वर्तमान.

————करवत असतें ... .रीतिवर्तमान.

————करवलें......................भूत.

————करवलें आहे................ .वर्तमानभूत.

————करवलें होतें................भूतभूत.

————करवत होतें. .. ..अपूर्णभूत.

————करवे, करवत असे.........रीतभूत.

————करवलें झालें................पूर्णभूत.

माझ्यानें अ० मला करवणार होतें........भविष्यभूत.
————करवेल.......................भविष्य.
————करवत असेल...............अपूर्णभविष्य.
————करवणार आहे............वर्तमानभविष्य.

आज्ञार्थ

माझ्यानें अ० मला करवो...............वर्तमान.

विध्यर्थ.

या अर्थी प्रशस्त रीतीनें रूपें होत नाहींत, म्हणोन तीं एथें लिहिलीं नाहींत.

संकेतार्थ

माझ्यानें अ० मला करवतें...............भूत.
————करवत असतें.............अपूर्णभूत.
————करवलें असतें..............भूतभूत.

संशयार्थ.

माझ्यानें अ० मला करवत असलें........वर्तमान.
माझ्यानें अ० मला करवलें असले........भूत.
————करवणार असलें............भविष्य.
————करवत असेल.............वर्तमानभविष्य.
————करवलें असेल.............भूतभविष्य.
————करवणार असेल...........भविष्यभविष्य.

११६. याप्रमाणें नस या सहाय धातूचीं रूपें अस या सहाय धातूच्या रूपांच्या ठिकाणीं लाविलीं असतां, अथवा कोठें कोठें न आणि नये हे शब्द लाविले असतां, अकरणरूपीं, सर्व भेदीं, सर्व अर्थी, सर्व प्रयोगीं, सर्व काळीं, धातूंचीं रूपें सिद्ध होतात; जसें—'मीं करित नाहीं,' "म्यां केलें

नाहीं,' 'मी करित नव्हतों,' 'मी करीना, अ० नकरीं अ० करीत नसें;' 'केलें नव्हतें;' 'करणार नव्हतों;' 'करणार नसेन;' इ०

११७. अकरणरूपीं आज्ञार्थी, विध्यर्थी, आणि संकेतार्थी मात्र कांहीं फेरफार होतो तो दाखवितों.

कर धातु—अकरण रूप.

आज्ञार्थ.

वर्तमान काळ.

पुरुष.	एक०	अनेकव०
प्र०	मीं करूं नको'	आम्हीं करूं नको ?
द्वि०	तूं करूं नको.	तुम्हीं करूं नका.
तृ०	तो-ती-ते नकरू-नकरो.	ते-त्या तीं नकरूत-नकरोत.

विध्यर्थ.

वर्तमान काळ.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	म्यां करूं नये, अ० नये करूं.	आम्हीं करूं नये अ० नये करूं.
द्वि०	त्वा करूं नयेस, अ० नयेस करूं.	तुम्हीं करूं नये, अ० नये करूं.
तृ०	त्याणें-तिणें करूं नये, अ० नये करूं.	त्यांहीं करूं नये, अ० नये करूं.

संकेतार्थ

भूत काळ.

कर्तरिप्रयोग.

पुरुष.	एकव०	अनेकव०
प्र०	मी नकरितों, अ०करितोंना.	आह्मी न करितों, अ० करितोंना.
द्वि०	तूं न करितास, अ०करितासना.	तुह्मी नकरितेत, अ० नकरितां, अ० करितेतना, अ० करितांना.
तृ०	तो नकरिता, अ०करिताना.	ते नकरिते, अ०करितेना.

११८. जा, ये, दे, लाग, बस, आणि पाह, हे व आणखी दुसरे कित्येक धातुही कोठें कोठें सहाय धातूचीं कामें करितात; परतु यांचीं रूपें मुख्य धातूंच्या नियमित धातुसाधितांच्या रूपां पुढें नियमित अर्थी आणि नियमित काळीं मात्र लावितात; जसें-'तो विचार करित नाहीं, उगीच लिहित जातो,''तो मारिला जातो,''मारिला गेला,' 'त्याला चालतां येत नाहीं,' 'तो त्यास जाऊं देतो,''त्यानें चोरास पळूं दिलें,' 'मीं तें काम करूं लागलों,' 'तो उगीच रंग लावित बसतो,''संभाळ,तो निसटूं पाहतो,'इ०. (या विषयीं विस्तार माझ्या मोठ्या व्याकरणात केला आहे तो पहावा.)

११९. सहाय धातूंतून ज्यांच्या केवळ नियमित रूपांचाच प्रयोग नियमित अर्थी, नियमित काळीं, नियमित पुरुषीं मात्र होतो, त्यांस गौण अथवा सिद्ध क्रियापदें ह्मणतात; तीं-पाहिजे, नको, नये, आणि नलगे, हीं होत.

उदाहरणें

मला पुस्तक पाहिजे. त्याला पुस्तकें पाहिजेत.
मला कडू औषध नको. तिला मळकीं वस्त्रें नकोत.
तुला गेलें पाहिजे. मला निरंतर वाचायास पाहिजे.
तूं जाऊं नको. तुह्मीं निजूं नका.
त्याणें तें काम करूं नये. आह्मीं असें ह्मणूं नये.
त्यास काम करणें नलगे. तिला डागिणे व्हावेत.

१२०. जेव्हां कर्मासच कर्ता करायाचा असतो, तेव्हां जा या धातूचा प्रयोग करितात. अशा प्रयोगास कर्मकर्तरिप्रयोग ह्मणतात, जसें-'शिपाई चोर धरितो,' आणि 'शिपायानें चोर धरिला जातो,' यांत पहिल्या वाक्यांत चोर हें कर्म, आणि दुसऱ्या वाक्यांत अर्थ तसाच असून चोर हा कर्ता होतो. 'तो गाय बांधित नाहीं,' 'त्याच्यानें गाय बांधिली जात नाहीं,' 'त्या लढाईंत तो मारला गेला,' 'तुह्मास तो हुकूम केला जाईल,' इ० आणखी उदाहरणें.

(या कर्मकर्तरिप्रयोगाचा प्रचार इतर भाषांत फार आढळतो. या विषयाचा विस्तार माझ्या मोठ्या व्याकरणांत व त्याच्या पुरणिकेंत पहावा.)

१२१. धातूं वरून कितीएक नामें, विशेषणें, आणि अव्ययें साधतात; तीं खालीं त्यांच्या अर्थासुद्धां लिहून दाखवितों. यांस धातुसाधितें म्हणतात.

धातुसाधितें,

मुळरूप भेद,

नामें आणि विशेषणें.

करणें....................................क्रियावाचक.
कर्ता, अ० करता, करणार, करणारा........कर्तृवाचक.
केला, केलेला...............................कर्मवाचक.

अव्ययें.

करित, करितां, करितांनां........ } वर्तमानकालवाचक.
करित असतां, करित असतांनां.... }
केलें असतां, केलें असतांनां............भूतकालवाचक.
करून....................................पूर्वकालवाचक.
करूं, करायास, करावयास............निमित्तवाचक.
करावें, करावयाचें, करणें.................विधिवाचक.

प्रयोजक भेद.

नामें आणि विशेषणें.

करविणें....................................क्रियावाचक.
करविता, करविणार–रा....................कर्तृवाचक.
करविला, करविलेला.........................कर्मवाचक.

अव्ययें.

करवित, करवितां, करवितांनां, } वर्तमानकालवाचक.
करवित असतां,करवित असतांनां. }
करविलें असतां, करविलें असतांनां........भूतकालवाचक.
करवून....................................पूर्वकालवाचक.

करवूं, करवायास, करवावयास............निमित्तवाचक.
करवावें, करवायाचें—वयाचें...............विधिवाचक.

शक्य भेद.

नामें आणि विशेषणें.

करवणें....................................क्रियावाचक.
करवलें, करवलेलें........................कर्मवाचक.

अव्ययें.

करवत, करवतां, करवतांनां,
करवत असतां, करवत असतांनां. } वर्तमानकालवाचक.
करवलें असतां, करवलें असतांनां........भूतकालवाचक.

यांच्या मागें 'न' हें अव्यय योजिलें असतां अकरण रूपीं धातुसाधितें होतात.

१२२. कित्येक धातूंचीं भूतकाळाचीं रूपें अनियमित होतात; त्यांतून कांहीं एथें सांगतों.

धातु.	भूतकाळ.	धातु.	भूतकाळ.
करणें.	केलें.	घालणें	घातलें.
मरणें.	मेलें.	मागणें.	मागितलें.
जाणें.	गेलें.	सांगणें.	सांगितलें.
येणें.	आलें.	ह्मणणें.	ह्मटलें, ह्मणालें
होणें.	झालें.	पिणें.	प्यालें.
घेणें.	घेतलें.	भिणें.	भ्यालें.
देणें.	दिलें.	विणें.	व्यालें.
उडणें.	उडालें	पळणें.	पळालें.
इ०.	इ०.	इ०.	इ०.

१२३. एका क्रियेच्या अर्थी दोन शब्दांचा प्रयोग होऊन जें क्रियापद साधतें त्यास **संयुक्त क्रियापद** म्हणावें; जसें–विकत घेणें, तोंडीं लावणें, जेऊं घालणें, श्रवण करणें, इ०.

(उ) क्रियाविशेषण अव्ययें.

१२४. ज्या शब्दानें क्रियेच्या गुणाचा अथवा प्रकाराचा अथवा अमुक अवस्थेंत अमुक काळीं अमुक स्थळीं ती क्रिया घडली, इत्यादि अर्थाचा, बोध होतो, तो शब्द **क्रियाविशेषण** होय; जसें 'हळू चालतो,' 'फार खर्चतो,' 'हसत जेवतो,' इ०; या वाक्यांत हळू, फार, हंसत, हीं क्रियाविशेषणें हात.

(अ) यांत कित्येक **शुद्ध क्रियाविशेषण अव्ययें** असतात; जसें–हळू, लौकर, निमूट, पुनः, वारंवार, इ०.

(आ) कित्येक **धातुसाधित क्रियाविशेषणें** असतात; जसें–खेळत, हंसत, खेळतां, हंसतांनां, खेळत असतां, खेळत असतांनां, इ०.

(इ) कित्येक **शुद्ध विशेषणें** असून त्यांचा संबंध अथवा अन्वय क्रियेकडेस असतो; (अशांचा भरणा मराठी भाषेंत फार आहे) जसें–'तो चांगलें लिहितो,' 'ती गोड बोलत्ये,' 'त्या मधुर गातात,' इ०.

मराठी भाषेंत गुणविशेषणाचीं क्रियाविशेषणें होत असतां त्याच्या रूपात बहुधा कांहीं फेरफार होत नाहीं

१२५. कित्येक क्रियाविशेषणें. असून कर्त्याच्याच

अनुरोधानें वागतात; जसें-ती उगी राहिले,' 'ते उभे राहतात,' 'त्या आडव्या जातात,' इ०.

१२६. क्रियाविशेषणें क्वचित् दुसऱ्याही क्रियाविशेषणाचा अथवा विशेषणाचा प्रकार दाखवितात; जसें—'तो फार लौकर बोलतो,' 'तो मोठा ठक आहे,' इ०.

१२७. मराठी भाषेंत अनुकरणवाचक शब्द निरंतर क्रियाविशेषणें असतात; जसें—फटकन, फटकर, फटदिनी, फटदिशीं, गटकन, गटकर, गपगप, धसधस, पुरपुर, तुरतुर, फडफडां, दबादब, कडाकड, धडाधड. इ०. अशा अनुकरणवाचक क्रियाविशेषणांचा भरणा मराठींत फार आहे.

१२८. कित्येक शब्दांस विभक्ति असतां त्यांचा प्रयोग केवळ अव्यया प्रमाणें होतो; जसें—इतक्यात, सकाळाला, दिवसास, दिवसाचा, रात्रीस, रात्री, तशांत, मोठ्यानें, अनशेपोटीं, अनवाणीं, इ०; उदा०—'इतक्यांत सूर्य मावळला,' 'तूं उद्यां सकाळाला ये,' 'तशांत मीं गेलों असतों,' 'तो मोठ्यानें ओरडला,' 'या अनवाणीं चालतात,' इ०.

१२९. दर घरीं, दर गांवीं, हे शब्द, आणि अशा अर्थी जे—घरोघर, गांवोगांव, दारोदार, असे शब्द येतात, तींही क्रियाविशेषणें होत; उदा०—'तो दारोदार भटकतो,' 'मीं गांवोगांव फिरलों,' 'हीं झाडें एथें रानोरान असतात,' इ०.

१३०. कित्येक क्रियाविशेषण अव्ययें त्यांच्या अर्थामुळां एथें सांगतों.

स्थलवाचक........तेथें, एथें, जेथें, इकडे, तिकडे,
कोणीकडे, पलिकडे कोठें, इ०.

कालवाचक........तेव्हां, एव्हां, जेव्हां, केव्हां, उद्यां,
काल, आज, परवां, यदां, गतसालीं, इ०.

संख्यावाचक.....एकदां, दोनदां, दहादां, शंभरदां इ०.

क्रमवाचक.........पहिल्यानें, दुसऱ्यानें, इ०.

निश्चयार्थक........खचित, खरोखर, निःसंशय, इ०.

(उ) उभयान्वयी अव्ययें.

१३१. ज्या अव्ययाचा संबंध दोन शब्दां कडेस अथवा वाक्यांकडेस असून त्यांस जें जोडितें त्यास **उभयान्वयी अव्यय** ह्मणावें; जसें-आणि, जर, तर, परंतु, अथवा, किंवा, तरीं, जरीं, कांकी, इ०. उदाह०-'रामा आणि कृष्णा तेथें गेले आहेत,' या वाक्यांत **रामा** आणि **कृष्णा** या उभयतांचा **गेले आहेत** या क्रिये कडेस अन्वय जाणावा.

१३२. कित्येक उभयान्वयी अव्ययें अर्थासुद्धा सांगतों.

समुच्चयवाचक ....आणि, व, आणखी.

पक्षांतरबोधक...........पण, परंतु, अथवा, किंवा,
नाहीं तर, पक्षीं, इ०.

न्यूनत्वबोधक........ ....कदाचित्, किंचित्, बहुधां, बहुत करून, प्रायः, इ०.

कारणोभयान्वयीबोधक..कारण, कांकीं, कांजर,
त्यास, इ०.

संकेतोभयान्वयीबोधक...जर, तर, जरीं, तरीं, इ०.

(ऋ) शब्दयोगी अव्ययें.

१३३. कोणत्याही स्थलवाचक अथवा कालवाचक शब्दांशीं ज्या अव्ययांचा योग होतो, तीं **शब्दयोगी अव्ययें** जाणावीं; ज्या शब्दांशीं यांचा योग अथवा अन्वय असतो, त्यांचें या अव्ययांच्या योगानें सामान्यरूप होतें; जसें-वर, खालीं, पुढें, मागें, नंतर, कडे, मध्यें, पूर्वी, अगोदर, इ०. उदाहरण 'झाडा वर, घरा खालीं, घोड्या पुढें, इ०. यांत वर, खालीं, पुढें यांच्या योगानें झाड, घर, घोडा, यांचीं झाडा, घरा, घोड्या, अशीं सामान्यरूपें झालीं आहेत.

सामान्यरूपाशीं हीं शब्दयोगी अव्ययें मिळवून लिहिण्याची चाल प्रशस्त नाहीं सामान्यरूपें निराळीं करून पुढें, अंतरानें शब्दयोगी अव्ययें लिहावीं, जसें— घरा पुढें, घोड्या वर, आते कडे, राजवाड्या समोर, इ०. हें मला प्रशस्त दिसतें या नियमाकडे कोणी लक्ष देत नाहीं ही थोडी दुःखाची गोष्ट आहे परंतु परिपाठ पडला आहे तो बलवत्तर आहे.

१३४. पावेतों, पर्यंत, इत्यादि कित्येक शब्दयोगी अव्ययांच्या योगानें कोठें कोठें सामान्यरूप होत नाहीं; जसें-दोन महिने पावेतों, चार दिवस पर्यंत, सकाळ पर्यंत, इ०.

१३५. शब्दयोगी अव्ययांवरून चा, ला, आणि ईल प्रत्यय लिंगभेदें करून लाविले असतां ते शब्द विशेषणें होतात; जसें-वरचा, खालचा, पुढला, मागला, समोरलें, आंतील, बाहेरील, इ०.

१३६. यांत कित्येक शुद्ध शब्दयोगी अव्ययें असतात. त्यांच्या योगानें सामान्यरूप होत नाहीं; तीं—च, हि, ही, मात्र, ना, देखील, इ०.

हीं शुद्ध शब्दयोगी अव्ययें ज्या शब्दां पुढें येतील त्यांशीं तीं जोडून लिहावीं.

(ऋ) केवलप्रयोगी अ० उद्गारवाची अव्ययें.

१३७. ज्या अव्ययांच्या योगानें बोलणाऱ्याच्या मनांतील हर्षशोकादि विकार अथवा उद्गार समजतात, तीं केवलप्रयोगी अ० उद्गारवाची अव्ययें जाणावीं; जसें—अं:, छि:, छी, वाहवा, शाबास, भले, इ०. यां पुढें (!) असें चिन्ह करितात.

१३८. संबोधनी जीं उद्गारवाची अव्ययें असनात तीं लिंगवचनाच्या अनुसंधानानें असतात.

लिंग.	एकव०	अनेकव०
पु०—	अरे, रे, अगा, अजि.	अहो, हो, अजि
स्त्री०—	अगे, गे, अगो.	

साधितशब्दविचार.

१३९. साधित शब्द दोन प्रकारचे आहेत. एक शब्दसाधित आणि दुसरा धातुसाधित.

(अ) शब्दा वरून जे साधतात ते शब्दसाधित; जसें—माणुसपण, देवपण; खरेपणा, वेडेपणा; धिटाई, महागाई; गुलामगिरी; पुणेकर, काशीकर; मारेकरी, भाडेकरी; झोपाळू, लाजाळू; पैठणी, शहागडी; शास्त्री, ज्योतिषी; खोडकर, विणकर; पाटिलकी, महारकी; दारूखोर, भांडखोर; दुकानदार, पोतदार; दम्या, खोकल्या, भांग्या; रानवट, मोळवट, कडवट; किफायतवार, बयादवार; बापुडवाणा, लाजिरवाणा; घरवाला, लेंकुरवाळा, भाजीवाला; खाणावळ, दळणावळ; इ०.

हे शुद्ध मराठी साधित शब्द सांगितले.

१४०. संस्कृत साधित शब्द या भाषेंत फार येतात त्यांचा एथें विस्तार करिता येत नाहीं, परंतु त्यांतून थोडे जे मुख्य मुख्य आहेत ते सांगतों;—प्रापंचिक, व्यावहारिक, आनंदित, दुःखित, कोपिष्ठ, रागिष्ठ, भक्षणीय, गुणक, बाधक, ब्राह्मणत्व, लघुत्व, मधुरता, विद्वत्ता, श्रीमंत, बुद्धिमान्, द्रव्यवान्, यशवंत, पुत्रवती, सौभाग्यवती, वैष्णव, शैव, पौत्र, पार्थिव, इ०.

१४१. धातू वरून जे साधतात ते **धातुसाधित; असें**-मार, तोड, रड; ठेचा, ठेवा, झगडा; विकाऊ, बिणाऊ, शिकाऊ; उडी, बुडी, थापडी; कोरीव, ओतीव; मोडका, रडका; दळण, कांडण, घुमळण, सारवण, तारण, पोषण; निजणार—रा, खाणार-रा; घडणावळ, धुणावळ; करणी, पेरणी; मिरवणें, खेळणें, बोलणें; लाव्या, मान्या; इ०.

सामासिकशब्दविचार.

१४२. दोन किंवा अधिक शब्द अथवा नामें मिळून जो एक शब्द होतो, अथवा एक नाम होतें, तें **सामासिक नाम** जाणावें; आणि या एकत्र जोडलेल्या शब्दांमध्यें जो परस्परांचा अर्थानें संबंध असतो त्यास **समास** असें ह्मणावें.

१४३. हे समास सात आहेत--द्वंद्व, तत्पुरुष, कर्मधारय, बहुव्रीहि, द्विगु, मध्यमपदलोपी, आणि अव्ययीभाव.

१४४. दोन अथवा अधिक शब्दांचा संयोग होऊन म-

धरल्या आणि या अव्ययाचा ज्यांत लोप होतो, ह्मणजे तें अव्यय नसतां जेथें एक शब्द होतो, तेथें तो **द्वंद्व समास** जाणावा जसें-- **इटीदांडू** म्हणजे इटी आणि दांडू तो; याच प्रमाणें-- **आईबाप, बहीणभाऊ, बापलेंक, ब्रह्माविष्णुमहेष,** इ०.

१४५. या **द्वंद्व** समासाचा आणखी एक प्रकार असा आढळतो कीं, जेथें दोन शब्द जोडले असतां आणखी त्या शिवाय इतर तशा जातिच्या पदार्थांचाही त्यांत संग्रह होतो; असें असलें म्हणजे त्यास **समाहार द्वंद्व,** म्हणतात;जसें— **भाजीपाला,** ह्मटलें ह्मणजे केवळ **भाजी** आणि **पाला** इतके दोनच पदार्थ समजूं नयेत,तर सर्वप्रकारची शाकभाजी समजली पाहिजे; तसेंच--**कोळीमाळी, शेटसावकार, घरदार, मीठभाकर, शेतभात, वाणीउदमी,** इ०.

भाकरीबिकरी, दगडबिगड, लहानसहान, इ०. शब्दही याच प्रकारचे जाणावे.

१४६. जेथें पूर्व शब्दाच्या विभक्तीचा संबंध पुढल्या शब्दाशीं असून विभक्तीचा लोप असतो, तेथें **तत्पुरुष** समास जाणावा; जसें--**द्विजदंड,** ह्मणजे द्विजाप्रत जो दंड तो, **कृपावलोकन** ह्मणजे कृपेनें जेंअवलोकन तें, **देवघर,** ह्मणजे देवाचें जें घर तें,**वनभोजन** ह्म०वनातलें जें भोजन तें.

१४७.बोलणाराच्या मनांत उभय शब्दांचा भाव ज्यांत समान असतो, अथवा विशेष्यविशेषणांचा योग असून जेथें समास घडतो, तेथें **कर्मधारय** समास जाणावा; जसें— **काळपुरुष** ह्मणजे काळ हाच कोणी पुरुष, अथवा काळा

सारखा जो पुरुष तो; **तांबडमाती, काळमांजर, भव-सागर,** इ० आणखी उदाहरणें.

माऊसभाऊ, आतेबहीण, चुलतसासरा. नातजांवई हीं आणखी याच समासाचीं उदाहरणें जाणावीं.

१४७. जेथें दोन शब्दांचा योग असतां तिसरा पदार्थ जाणिला जातो, तेथें **बहुव्रीहि** समास होतो; जसें- **चक्रपाणि,** ह्मणजे चक्र आहे पाणीच्या ठायीं ह्मणजे हातीं ज्याच्या तो—विष्णु; **चतुर्भुज, शशिशेखर** इ०. आणखी उदाहरणें.

१४८. पूर्व शब्द संख्यावाचक असून पुढल्या शब्दाशीं जेथें समास होतो, (आणि हा समास बहुधा समाहारार्थीं ह्मणजे समुदायाच्या अर्थीं असतो,)तेथें **द्विगु** समास जाणावा; जसें—**पंचपाळें,** ह्मणजे पांचा पाळयाचा समुदाय; याच प्रमाणे **पंचारती, पचखाजे, अठगवाब, बारभाई,** इ०.

१४९. दोन शब्दांच्या मधल्या पदाचा लोप होऊन जेथें समास होतो, तेथें **मध्यमपदलोपी** समास जाणावा; जसें—**साखरभात** म्हणजे साखरेनें युक्त अथवा साखर घालून केलेला जो भात तो; याच प्रमाणें—**कातरविडा, घरजांवई,** इ०. आणखी उदाहरणें.

१५०. जेथें पूर्व शब्द अव्यय असून त्याचा पुढल्या शब्दांशीं संबंध असतो, आणि तें सारें सामासिक पद क्रियाविशेषण अव्यय असतें तेथें **अव्ययीभाव** समास जाणावा; जसें—**दरमजल, दरदिवस, हरघडी, गांवगन्ना,** इ०.

कारकविचार.

१९१. क्रियेच्या संबंधानें जो नामांच्या विभक्तीचा अर्थ त्यास **कारक** म्हणावें. हे विभक्तीचे अर्थ सहा आहेत;–**कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान,** आणि **अधिकरण**.

१९२. प्रथमा विभक्ति असतां क्रियेच्या संबंधानें तिचे दोन अर्थ असतात, **कर्ता** आणि **कर्म**, उ०–'रामा लिहितो,' 'बाळा चालतो,' 'गंगू रडत्ये,' इ०. यांत **रामा, बाळा,** आणि **गंगू** हे प्रथमान्त शब्द त्या त्या क्रियांचे **कर्ते** होत. आणि 'रामा पोथी लिहितो,' 'अहिल्या गीता वाचत्ये,' 'बाळा काम करितो,' 'गंगू गाय बांधित्ये,' इ०. यांत **पोथी, गीता, काम,** आणि **गाय,** ही प्रथमान्त नामे त्या त्या क्रियांचीं कर्में होत.

१९३. द्वितीयान्त नामें कर्में असतातः उदाह०– 'बाळा गोपाळास मारितो,' 'आई मुलांस राखित्ये','त्याणें त्याला पाळिलें,' यांत गोपाळास इ०.द्वितीयान्त नामें त्या त्या क्रियांचीं कर्में होत.

द्वितीयेचीं आणि चतुर्थीचीं रूपें सारखीं होतात; ह्मणोन जेथें कर्माचा अर्थ नसतो तेथें तीं चतुर्थीचीं रूपें मानावीं.

१९४. तृतीयेचे अर्थ पुष्कळ आहेत, परंतु त्यांत मुख्य **कर्ता** आणि **करण** हे दोन होत. एकादी क्रिया करायाचें जें साधन, म्हणजे ज्याच्या योगानें ती क्रिया घडत्ये, त्यास **करण** म्हणावें; उ०—'नानानें चाबकानें आपल्या घोड्यास मारिलें,' 'पांडूनें लेखणीनें धडा लि-

दिला,' यांत नानानें आणि पांडूनें ही तृतीयान्त नामें त्या त्या क्रियांचे कर्ते होत; आणि चाबकानें आणि लेखणीनें हीं नामें तृतीयान्त खरीं, परंतु या तृतीयेचा अर्थ करण होय.

१५५. ज्या कारणें व ज्याच्या साठीं, एकादी क्रिया घडल्ये तें संप्रदान; चतुर्थीचा अर्थ संप्रदान असतो; उदाह०—'नानानें पांडूला धडा शिकविला,' 'बाळानें भिकाऱ्यांस पैसे वाटले;' यांत पांडूला आणि भिकाऱ्यांस ही संप्रदानार्थी चतुर्थी होय.

कोठें अधिकरणार्थीही चतुर्थी होये; जसें—'तो डोकीस पागोटें गुंडाळितो,' 'तो रात्रीस जागतो,' इ०.

१५६. ज्या संबंधानें अवधीचा अथवा वियोगाचा अथवा अधिक उणेपणाचा बोध होतो, त्यास अपादान म्हणावें; पंचमी विभक्तीचा हा अपादान अर्थ असतो. उदाह०—'मुंबईहून पुणें साठ कोस आहे,' 'तो घरून आला,' 'त्याहून ती अधिक शाहणी आहे;' यांत मुंबईहून, घरून, आणि त्याहून, या पंचमीचा अर्थ अपादान होय.

१५७. ज्या ठिकाणीं अथवा ज्या काळीं एकादी क्रिया घडल्ये, तें ठिकाण, आणि तो काळ, यास अधिकरण म्हणावें; सप्तमीचा अर्थ अधिकरण होतो; उदाह०—'तो घरांत नाहीं' 'तो गांवांत फिरतो,' 'या वर्षी पाऊस चांगला पडला" यांत घरांत, गांवांत, आणि वर्षी ही अधिकरणार्थी सप्तमी होय.

१५९. षष्ठी विभक्तीचा संबंध क्रियेशीं नसतो, परंतु इतर शब्दांशीं तिचा संबंध असतो, म्हणोन ही विभक्ति कारकांत मानीत नाहींत; उ०—'नानाचा भाऊ पांडू,' 'वेणूच्या बहिणी सुंदरा व अहिल्या;' 'रामाचें घर पुण्यांत आहे;' यांत नानाचा, वेणूच्या, रामाचें, या षष्ठीचा अर्थ संबंध भाऊ, बहिणी, घर, या शब्दांशीं आहे.

३. वाक्यरचना

१६०. वाक्यांत शब्दांची योजना कसकशी कोठकोठें करावी हें या प्रकरणांत सांगितलें असते. या विषयींचे नियम पुष्कळ आहेत; त्यांतून थोडे येथें सांगतों.

१६१. ज्यांत कर्ता आणि त्याची क्रिया पूर्णपणानें सांगितली असत्ये, त्यास **वाक्य** ह्मणावें;जसें-'नाना लिहितो,' ' पांडूनें धडा वाचला,' 'रामा उद्यां गावास जाईल,' इ०.

१६२. ज्यांत कर्ता आणि क्रिया असून अर्थाची समाप्ति होत्ये तें **पूर्ण वाक्य** जाणावें; जसें-' बाबा जातो,' ' सुंदरा आपल्या वाड्यांत खेळत्ये,'इ०.

१६३. ज्यांत अर्थाची समाप्ति झाली नसत्ये तें **अपूर्ण वाक्य** जाणावें; जसे-'जो शिकत असतां,' त्याणें तितकें काम करून,' इ०.

१६४. आतां वाक्यरचने विषयींचे कांहीं **मुख्य नियम** सांगतों.

नियम १. वाक्यांत पहिला कर्ता, दुसरें कर्म, आणि शेवटीं क्रियापद असावें. उदाह०-'बाळा पोथी लिहितो,' 'बाबा निरंतर देवाची भक्ति कारितो,' 'तिणें त्या बायांचा

चांगला आदरसत्कार केला,' 'जर तो गेला नसता, तर मीहि गेलों नसतों.'

नियम२. विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणें त्याच्या विशेषणाचें लिंगवचन असलें पाहिजे,मग तें विशेषण अथवा त्याचे विशेष्य त्या वाक्यांत कोणीकडे कां असेना; उदाह०—'तेव्हां त्याणें त्याचा मुलगा बहुतेक गुणांनीं संपन्न आणि रंगानें गोरा, परंतु एका डोळ्यानें किंचित् तिरवा असा पाहिला,' 'चान देशांत हिरवीं, पिवळीं, तांबडीं आणि दुसऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचीं पांखरें असतात.'

नियम ३. जर वाक्यांत पुष्कळ नामें एका पुढें एक असलीं, आणि त्या साऱ्यांस एकच विभक्ति, अथवा शब्दयोगी अव्यय लावायाचें असलें, तर त्यापुढें हा अथवा असा या सर्वनामाची योजना करून त्यास लावावें; उदाह०—'रामा, गोविंदा, मनी, विष्णु, यांचा बाप' 'माझें पागोटें, दुपेटा, शेला, रुमाल,हीं सारीं चोरीस गेलीं,' 'रामा, गोविंदा, हरि, आणि विष्णु. यांच्या पुढें त्याचे कांहीं चालावयाचें नाहीं चोरी, लबाडी, चहाडी, आणि दुसऱ्याची निंदा, हीं केलीं असतां त्यापासून दुःख उत्पन्न होतें.

नियम ४. जर एका क्रियापदाचे अनेक कर्ते असले तर शेवटल्या कर्त्यांच्या लिंगवचना वरून क्रियापद फिरतें; उदाह०'तो आणि ती गेली ;' 'गाड्या, घोडे, आणि उंटें, मागून चाललीं;' 'त्याणें आपलें स्नान, संध्या आणि जेवण आटोपिलें,' इ०.

नियम ५. कोणतेंही क्रियापद असलें तरी त्यास कर्ता पाहिजे, मग, तो कर्ता त्या वाक्यांत स्पष्ट असो, अथवा बाहेरून आणावा लागो; उदाह०—'रामा त्या कडेस गेला, परंतु भेटला नाहीं,' या वाक्यांत **भेटला नाहीं** या क्रियापदास कर्ता नाहीं ह्मणोन हें वाक्य शुद्ध नाहीं.

नियम ६. पदार्थाचा अतिशयपणा दाखवायाचा असतां बहुधा एक वचनाचा प्रयोग करितात; उदाह०—'यंदां देशा वर जोधळा फार पिकला,' 'काल यात्रेंत पुष्कळ माणूस लोटलें होतें.'

नियम ७. रूढींत असल्या शिवाय बहुधा केवळ मराठी आणि संस्कृत शब्दांचा समास करूं नये, 'गांव प्रदक्षिणा,' 'हत्तिचर्म,' असें ह्मणू नये,—'ग्रामप्रदक्षिणा,' आणि 'हस्तिचर्म' असें म्हणावें.

(या वाक्यरचनेचे पुष्कळ अगत्याचे नियम आहेत, ते माझ्या मोठ्या व्याकरणांत पहावे.)

विरामचिन्हें.

१६५. ग्रंथ वाचतांना त्याचा अर्थ स्पष्ट समजविण्या करतां जागोजाग थांबावें लागतें, कोठें फार वेळ, आणि कोठें थोडा वेळ तरीं थांबावें लागतें; हें जाणविण्या करितां चिन्हें करितात, त्यास **विरामचिन्हें** ह्मणतात. हीं विरामचिन्हें सहा आहेत.—(,) हें **स्वल्पविराम,** (;)हें **अर्धविराम,** (:) हें **अपूर्णविराम,** (.)हें **पूर्णविराम,** (?) हें **प्रश्नचिन्ह,** आणि (!) हें **उद्गारचिन्ह.**

१६६. सरळ लांब वाक्यांत जर दुसरा लहान वा-

क्यें अथवा शब्द, थोडा विराम घेऊन निरनिराळीं दाखवायाचीं असलीं तर **स्वल्पविराम** चिन्ह दिले पाहिजे; जसें—'एक मुलगा, आपल्या आंधळ्या बापास हातीं धरून, भीक मागत फिरत होता.' 'त्यास जेव्हां गरीबी आली, तेव्हां त्याणें आपला घोडा, उंट, गाई, आणि कुतरेंही विकलें.'

१६७. जेथें एकाद्या लांब वाक्यांत लहान मोठीं वाक्यें संपतात, परंतु त्यात अर्थाची समाप्ति होत नाहीं तेथें त्या लहान मोठ्या संपलेल्या वाक्या पुढें **अर्धविराम** चिन्ह द्यावें; जसें—'ईश्वराची भक्ति मनानें केली पाहिजे; मनाचें अर्पण न करितां नुसत्या द्रव्याचें अर्पण केल्यानें देव प्रसन्न होईल असें दिसत नाहीं; आणि याप्रमाणें साधुंचीं वाक्येंही आहेत; परंतु त्यांचा लोक अगदी विचार करीत नाहीत.'

१६८. एकाद्या लांब वाक्यांत जेव्हां एकाद्या सांगितल्या अर्थास बळ आणण्याकरतां उदाहरणा प्रमाणें दुसरें वाक्य प्रविष्ट करावें लागते तेव्हां त्या वाक्या पूर्वी **अपूर्णविराम** चिन्ह द्यावें; उदाह०—'सर्वदेशांत साधु पुरुष होऊन गेले, ते असेंच ह्मणतात; आणि आपणही नित्य पाहतों: एथील सुख क्षणभंगुर आहे; ह्मणोन क्षणभंगुर सुखासाठीं लोभात पडून पाप करूं नये.'

१६९. जेथें पूर्णपणें वाक्य संपतें तेथें **पूर्णविराम** द्यावा. उदाह०—'त्याचा मुलगा काल घरीं आला.' 'मीं काल एक घर विकत घेतलें.' 'त्याणें चोरास धरिलें,

आणि तो त्याच्या मुसक्या बांधीत होता, इतक्यांत, फौजदाराचे शिपाई येऊन त्यांहीं त्या चोरास चावडीवर नेलें.

१७०. ज्या वाक्यांत प्रश्न केला असतो, त्या वाक्याच्या शेवटीं प्रश्नचिन्ह लिहावें. उदाह०—'तूं तेथें गेला होतास काय ?' 'तुह्मी इतकी खटपट कां करितां ?'

१७१. ज्या शब्दानें, अथवा ज्या वाक्यांत, हर्ष, शोक, आश्चर्य, इ० मनाचे भाव दाखवायाचे असतात, त्या पुढें उद्गारचिन्ह लिहावें; उदाह०—अहा ! केवढी मौज ही ! अरे देवा, आह्मावर केवढें मोठें संकट आहे !

व्याकरण सांगणें.

१७२. कोणत्याही वाक्यांत सर्व शब्दांचा व्याकरण रीतीनें पदच्छेद कसा करावा हे विद्यार्थ्यांस समजणें फार जरूर आहे, म्हणोन ती पदच्छेद करण्याची अथवा व्याकरण सांगण्याची रीत खाली दाखवितों.

(१) तीं मुलें तेथे खेळतात.

तीं—हें तें या दर्शक सर्वनामाचे, नपुंसकलिंगी, तृतीय पुरुषाचें, प्रथमेचें अनेकवचन. याचा संबंध मुलांकडे.

मुलें—हें मूल या अकारान्त, सामान्य नामाचें, नपुंसकलिंगीं, प्रथमेचें अनेकवचन. ही कर्तरि प्रथमा. हें खेळता या क्रियापदाचा कर्ता.

तेथें—हें स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय; याचा खेळतात या क्रियापदाकडे अन्वय.

खेळतात—हें क्रियापद, खेळ या अकर्मक धातूचें करण-

रूपीं, मूळरूपभेदीं, स्वार्थी, वर्तमानकाळीं, नपुंसकलिंगीं, तृतीय पुरुषाचें अनेकवचन.

यांत **मुलें** हा कर्ता, आणि **खेळतात** हें क्रियापद; हा **अकर्म कर्तरि** प्रयोग. (२)

त्यांहीं सरकारांत आजपर्यंत पुष्कळ अर्ज्या दिल्या; परंतु अद्यापि आमच्या वादाचा फैसला झाला नाहीं; तथापि लोक अशी अटकळ करितात कीं, ती मालमिळकत रामभाऊसच मिळेल.

त्यांहीं–हें **तो** या पुरुषवाचक सर्वनामाचें, पुल्लिंगीं, तृतीय पुरुषाचें, तृतीयेचें अनेकवचन; हीं **कर्तरि** तृतीया. **दिल्या** या क्रियापदाचा कर्ता.

सरकारांत–हें **सरकार** या अकारान्त सामान्य नामाचें नपुंसकलिंगीं, सप्तमीचें एकवचन.

आजपर्यंत–हें कालवाचक क्रियाविशेषण अव्यय; याचा **केल्या** या क्रियापदाकडे अन्वय.

पुष्कळ– हें विशेषण अर्ज्यांचें.

अर्ज्या–हें **अर्जी** या ईकारान्त सामान्य नामाचें, स्त्रीलिंगीं, प्रथमेचें अनेकवचन. ही **कर्मणि प्रथमा**; हें **दिल्या** या सकर्मक क्रियापदाचें कर्म.

दिल्या–हें क्रियापद. **दे** या सकर्मक धातूचें, करणरूपीं, मूळरूपभेदीं, स्वार्थीं, भूतकाळीं, स्त्रीलिंगीं, तृतीय पुरुषाचें अनेकवचन.

यांत **त्यांहीं** हा कर्ता, **अर्ज्या** हें कर्म, आणि **दिल्या** हें क्रियापद. हा **कर्मणि** प्रयोग.

परंतु—हें उभयान्वयी अव्यय.

अद्यापि—हें क्रियाविशेषण अव्यय. याचा **झाला नाहीं** या क्रियापदाकडे अन्वय.

आमच्या—हें **मीं** या पुरुषवाचक सर्वनामाचें, षष्ठीच्या अनेकवचनीं सामान्यरूप. **वादाचा** या सविभक्तिक विशेष्याच्या योगानें.

वादाचा—हें **वाद** या अकारान्त सामान्य नामाचें, पुल्लिंगीं, षष्ठीचें एकवचन; या षष्ठीचा **फैसला** या नामा कडे संबंध.

फैसला—हें **फैसला** या आकारान्त सामान्य नामाचें, पुल्लिंगीं, प्रथमेचें एकवचन. ही **कर्तरि** प्रथमा; हें **झाला नाहीं** या क्रियापदाचा कर्ता.

झाला नाहीं—हें **हो** या अकर्मक धातूचें, अकरण रूपीं, मूळरूप भेदीं, स्वार्थी, भूत काळीं, पुल्लिंगीं, तृतीय पुरुषाचें एकवचन.

यांत **फैसला** हा कर्ता, आणि **झाला नाहीं** हें क्रियापद, हा **अकर्म कर्तरि** प्रयोग.

तथापि—हें उभयान्वयी अव्यय.

लोक—हें **लोक** या अकारान्त सामान्य नामाचें पुल्लिंगीं, प्रथमेचें अनेकवचन. ही **कर्तरि** प्रथमा. हें **करितात** या क्रियापदाचा कर्ता.

अशी—हें **अशी** या दर्शक सर्वनामाचें स्त्रीलिंगीं, प्रथमेचें एकवचन; याचा अन्वय **अटकळ** या नामा कडे.

अटकळ—हें **अटकळ** या अकारान्त सामान्य नामाचें,

स्त्रीलिंगीं, प्रथमेचें एकवचन. ही कर्मणि प्रथमा. हें करितात या सकर्मक क्रियापदाचें कर्म.

करितात—हें कर या सकर्मक धातूचें, करण रूपीं, मूळरूप भेदीं, स्वार्थीं, वर्तमानकाळीं, पुल्लिंगीं, तृतीय पुरूषाचें अनेकवचन.

यांत लोक हा कर्ता, अटकळ हें कर्म, आणि करितात हें क्रियापद, हा सकर्म कर्तरि प्रयोग.

कीं—हें उभयान्वयी अव्यय.

ती—हें ती या दर्शक सर्वनामाचें स्त्रीलिंगीं, प्रथमेचें एकवचन, याचा अन्वय मालमिळकत या कडे.

मालमिळकत—हें मालमिळकत या अकारान्त सामासिक नामाचें स्त्रीलिंगीं, प्रथमेचें एकवचन, हा द्वंद्व समास. ही कर्तरि प्रथमा, मिळेल या क्रियापदाचा कर्ता.

रामभाऊस—हें रामभाऊ या ऊकारान्त विशेष नामाचें, पुल्लिंगीं, चतुर्थीचें एकवचन.

च—हें शुद्ध शब्दयोगी अव्यय.

मिळेल—हें मिळ या अकर्मक धातूचें, करण रूपीं, मूळरूप भेदीं, स्वार्थीं, भविष्य काळीं, स्त्रीलिंगीं तृतीय, पुरुषाचें एकवचन, यांत मालमिळकत हा कर्ता, आणि मिळेल हें क्रियापद; हा अकर्म कर्तरि प्रयोग.